दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
# रायगड नगरी
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..

● वर्ष १६ वे ● अंक १०६ ● MAHMAR/2006/17212 ● रायगड ● शनिवार दि.१० जुलै २०२१ ● किंमत १ ₹ www.raigadnagari.com

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम माध्यम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice,
Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

# ग्रामस्थांच्या संरक्षणासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे आंदोलन

## ओवळे गावामध्ये सिडकोच्या अतिक्रमण विभागाला रिकाम्या हाती परतावून लावले

**दै.रायगड नगरी । पनवेल**

**ओवळे गावात तोड कारवाई करण्यासाठी आलेल्या सिडकोच्या अतिक्रमण विभागाला रिकाम्या हाती परतावून लावण्याचे काम लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आले. ग्रामस्थांच्या संरक्षणासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सिडकोच्या पोकलेनसमोर ग्रामस्थांसह ठिय्या आंदोलन केले.**



दरम्यान लोकनेते दि. बा पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ कृती समितीचे अध्यक्ष दशरथदादा पाटील, आमदार महेश बालदी, सामाजिक कार्यकर्ता निलेश पाटील, युवा नेते दशरथ भगत, जे. डी. तांडेल यांनी या ठिय्या आंदोलनाला भेट देऊन पाठिंबा दिला. सायंकाळी सिडको अधिकारी, जिल्हाधिकारी यांच्याशी चर्चा झाली. त्यानंतर सिडकोच्या पथकाला रिकाम्या हाती परतावे लागले. येत्या तीन ते चार दिवसात या संदर्भात सिडको, लोकनेते दि. बा पाटील नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ कृती समिती, ग्रामस्थ यांच्यात बैठक होणार आहे. या बैठकीत योग्य पुनर्वसनाचा सकारात्मक तोडगा निघाला तरच कार्यवाही करण्यास सहमती असेल असा ईशारा सिडकोला समितीने दिला आहे.

भूमिपुत्र, स्थानिक, प्रकल्पग्रस्त शेतकरी, ग्रामस्थांच्या सदैव पाठिशी राहणारे ७० वर्षीय लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी ग्रामस्थांच्या पाठीशी ठामपणे राहून ठिय्या आंदोलन केल्याने ग्रामस्थांनी त्यांचे कौतुक आणि आभारही मानले. अंगावरून बुलडोझर नेला तरी चालेल पण जो पर्यंत कारवाई थांबवत नाही तो पर्यंत येथून उठणार नाही, असा पवित्रा लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी यावेळी घेत ग्रामस्थांना मोठा आधार दिला. त्यामुळे आंदोलकांमध्ये यावेळी मोठे बळ दिसले. प्रेरणास्थान दि. बा. पाटील यांनी आम्हाला 'संघर्षाशिवाय काहीही मिळत नाही' हे शिकवले आहे, त्यांचा आशिर्वाद आणि आदर्शाने आम्ही काम करीत असून भूमिपुत्रांच्या हक्कासाठी लढत राहू, संघर्ष करत राहू, असेही लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी यावेळी अधोरेखित केले.

सिडकोच्या अतिक्रमण विरोधी विभागाने आज (शुक्रवार, दि. ०९ जुलै) मोठा पोलिस बंदोबस्त आणि सिडकोच्या सुरक्षा रक्षकांच्या फौजफाट्यासह बुलडोझर, पोकलेन घेऊन येत ओवळे येथे कारवाई करण्याचा प्रयत्न केला. यावेळी केंद्र सरकारच्या एका प्रकल्पासाठी केवळ रिक्त शाळेवर कारवाई



करणार आहोत असे सिडको अधिकाऱ्यांचे म्हणणे होते,परंतु त्या कारवाई चे आड येथील तीन पात्र घरे देखील तोडण्याचा सिडको चा मनसुबा असल्याने ग्रामस्थांनी विरोध केला. यावेळी माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थांनी बुलडोझर समोर ठिय्या देत अतिक्रमण विरोधी पथकाला रोखून धरले. पावसाळ्यात अतिक्रमण विरोधी तोडक कारवाई न करण्याचे आदेश असताना सुद्धा अतिक्रमण विरोधी पथकाचे अधिकारी ढगे यांचे ढग ओवळे गावावर कसे काय जमले? असा प्रश्न जनमानसातून उपस्थित होत होता?

यावेळी लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी म्हंटले कि, पनवेल तालुक्यातील खालचे ओवळे येथे घेरे तोडण्यासाठी सिडको अधिकारी पोलीस फौजफाट्यासह आले. महिला भगिनी, ज्येष्ठ नागरिक आणि अपंग व्यक्ती या कारवाईमुळे रडत आहेत. येथील ग्रामस्थांचे म्हणणे आहे आम्हाला कुठल्याही प्रकारे पुनर्वसन नाही. आमच्या घराची पात्रता नाही, कुठे जागा आणि पुनर्वसन करणार याचा अद्यापही पत्ता नाही. असे असतानाही घरांना हात लावत असाल तर कुठल्याही परिस्थितीत कारवाई करू देणार नाही. हा निर्धार करूनच ग्रामस्थ आंदोलनाला बसले आहेत. मला ग्रामस्थांचा फोन आला त्या अनुषंगाने आम्ही तात्काळ या ठिकाणी आलो. गोरगरिबांचे घरे तोडण्यासाठी आणि संसार उध्वस्त करण्यासाठी फार मोठा फौजफाटा सिडकोने का आणला? असा सवालही त्यांनी उपस्थित केला. महाविकास आघाडी सरकार आल्यानंतर त्यावेळच्या प्रकल्पग्रस्त समितीच्या माध्यमातून महेंद्र घरत, बबन पाटील यांनी जाऊन घरांच्या बाबतीत मुख्यमंत्र्यांसमोर प्रश्न मांडला होता, त्या निवेदनात आमचीही स्वाक्षरी आहे. त्यावेळी योग्य पुनर्वसन झाल्याशिवाय घरे तोडली जाणार नाहीत अशी ग्वाही त्यांनी दिली आहे. मुख्यमंत्र्यांनी शब्द दिला आहे. मात्र सिडकोचे अधिकारी येथे येऊन घरे तोडायला आले. पोलीस गाड्या, पोकलेन, जेसीबी आणले आहेत, ते आमच्या अंगावरून गेले तरी चालतील आम्ही येथून हलणार नाही, असा पवित्रा लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी यावेळी घेतला.

या आंदोलनात रामशेठ ठाकूर यांच्या सह प्रकल्पग्रस्त लॉरी चालक-मालक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष नंदराज मुंगाजी, एडवोकेट रेश्मा अमित मुंगाजी, तंटामुक्ती गाव अध्यक्ष अमित मुंगाजी, मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक राजेंद्र पाटील, कुंडेवहाळचे सरपंच सदाशिव वास्कर,सदस्य दत्ता पाटील, सुनिल म्हात्रे, विश्वनाथ म्हात्रे, अमीर म्हात्रे, सुनिल पाटील, गजानन पाटील, आदी मान्यवरांच्या समवेत ग्रामस्थ आणि प्रकल्पग्रस्त बांधव मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

> प्रकल्पग्रस्तांची गरज, मागण्या, आणि पुनर्वसन या करता सिडको अजिबात कार्यतत्परता दाखवत नाही, परंतु कारवाई करताना मात्र ते वायूच्या वेगाने हजर होतात. आज पावसाळ्यात देखील तोडक कारवाई होत आहे त्यामुळे नवी मुंबई विमानतळाला दिवंगत लोकनेते माजी खासदार दि. बा. पाटील यांचे नाव देण्यासाठी आम्ही जे आंदोलन करत आहोत त्याचा सिडको सूड तर उगवत नाही ना? असा संशय आमच्या मनात येऊ लागला आहे. प्रकल्पग्रस्तांवर अन्याय म्हणजेच ९५ प्रकल्पग्रस्त गावांवर अन्याय आहे, तो कदापिही खपवून घेणार नाही.
>
> **लोकनेते रामशेठ ठाकूर**

## संक्षिप्त...

### राज्यातील पोटनिवडणुका अखेर स्थगित

**दै.रायगड नगरी । मुंबई**

कोरोना संसर्गाची दुसरी लाट अद्याप पूर्णपणे ओसरली नसतानाच तिसऱ्या लाटेचा आणि डेल्टा प्लस विषाणूचा मोठ्या प्रमाणावर प्रसार होण्याची भीती लक्षात घेऊन राज्यात कडक निर्बंध लागू असल्याने राज्यातील ५ जिल्हा परिषद व त्यांअंतर्गतच्या ३३ पंचायत समित्यांमधील रिक्तपदांच्या पोटनिवडणुकांची प्रक्रिया आज आहे त्या टप्प्यावर स्थगित करण्यात येत असल्याची घोषणा राज्य निवडणूक आयुक्त यू. पी. एस. मदान यांनी केली.

मदान यांनी सांगितले की, धुळे, नंदुरबार, अकोला, वाशीम आणि नागपूर या ५ जिल्हा परिषदांमधील ७० निवडणूक विभाग आणि ३३ पंचायत समित्यांमधील १३० निर्वाचक गणांमधील पोटनिवडणुकांसाठी १९ जुलै २०२१ रोजी मतदान होणार होते; परंतु ७ जुलै रोजी राज्य शासनाने कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर या पोटनिवडणुका स्थगित करण्याची विनंती राज्य निवडणूक आयोगाला केली होती. सर्वोच्च न्यायालयाचे ६ जुलै २०२१ रोजीचे आदेश आणि राज्य शासनाची विनंती लक्षात घेऊन राज्य निवडणूक आयोगाने राज्य शासनाकडून कोविड-१९ बाबत अधिकची माहिती आणि जिल्हाधिकाऱ्यांकडून सविस्तर अहवाल मागविले होते. त्याआधारे आयोगाने या निवडणुका आज आहे त्या टप्प्यावर स्थगित केल्या आहेत. त्यामुळे या पोटनिवडणुकांसाठी लागू असलेली आचारसंहितादेखील आजपासून शिथील करण्यात आली आहे. कोविड-१९ ची परिस्थिती सुधारल्यावर या पोटनिवडणुकांचे उर्वरित टप्पे पार पाडण्यासंदर्भात राज्य निवडणूक आयोगातर्फे घोषणा करण्यात येईल, असेही मदान यांनी सांगितले.

**मांदाड प्राथमिक आरोग्य केंद्राचे पालकमंत्री आदिती तटकरे यांचे हस्ते उद्घाटन**

## आरोग्याच्या जास्तीत जास्त सेवा, सुविधा उपलब्ध करणार : पालकमंत्री आदिती तटकरे



**दै.रायगड नगरी । तळा**

तळा तालुका डोंगराळ दुर्गम भाग असणाऱ्या तळा तालुक्यातील नागरिकांना अधिकाधिक आरोग्याच्या सुविधा उपलब्ध व्हाव्यात या दृष्टिकोनातून मांदाड-कुडे विभागातील नागरिकांनी प्राथमिक आरोग्य केंद्राची मागणी केली होती. या आरोग्य सेवा सर्वां पर्यंत पोहचल्या पाहिजेत यादृष्टीने मांदाड येथे सुसज्ज असे प्राथमिक आरोग्य केंद्राचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला त्यास पालकमंत्री माननीय अदिती तटकरे, खासदार सुनिल तटकरे व आमदार अनिकेत तटकरे यांच्या प्रयत्नानी पूर्ण होऊन मांदाड प्राथमिक आरोग्य केंद्राचे उद्घाटन पालकमंत्री आदिती तटकरे यांचे हस्ते झाले.

सदर प्रसंगी रायगड जिल्हा परिषद उपाध्यक्ष सुधाकर घारे, महिला व बालकल्याण सभापती रा.जि.प. गिताताई जाधव, पं.स.सभापती अक्षरा कदम, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.किरण पाटील उपसभापती गणेश वाघमारे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.सुधाकर मोरे तालूका आरोग्य अधिकारी डॉ.विनोद गोरेगांवकर माजी सभापती देवकी लासे, सरपंच तानाजी कालप अँड.उत्तम जाधव, राष्ट्रवादीचे तालुकाध्यक्ष नाना भौड, तहसिलदार आण्णापा कनशेट्टी, गटविकास अधिकारी विजय यादव, वैद्यकीय अधिकारी डॉ.अमोल बिरवटकर, .../२

## प्रशासनाला मित्र माना, आम्हीही डॉक्टरर्सना सर्वतोपरी मदत करू : आयुक्त गणेश देशमुख

**तिसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर बाल रुग्णालयांना मिळणार कोविड रुग्णालयाची परवानगी**

**दै.रायगड नगरी । पनवेल**



संभाव्य कोविड -१९ च्या तिसऱ्या लाटेत लहान मुलांना संसर्ग होण्याची शक्यता वर्तविली जात आहे. याच पार्श्वभूमीवर महापालिका अधिकारी आणि पालिका क्षेत्रातील तज्ज्ञ डॉक्टरर्स यांच्या टास्क फोर्सची निर्मिती करण्यात आली आहे. यांची नुकतीच ऑनलाईन बैठक आयुक्त श्री.गणेश देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. संभाव्य लाटेत लहान मुलांच्या संरक्षणासाठी कराव्या लागणाऱ्या उपाययोजनांचा यावेळी आढावा घेण्यात आला. प्रशासनाला मित्र माना, आम्हीही डॉक्टरर्सना सर्वतोपरी मदत करू, त्यांना सर्व सुविधा पुरवू असे आश्वासन यावेळी आयुक्तांनी दिले.

संभाव्य तिसऱ्या लाटेमध्ये लहान मुलांना अधिक धोका होऊ नये म्हणून खबरदारीच्या दृष्टीने महानगरपालिका कार्यक्षेत्रातील बालरूग्णांलयाना परवानगी देण्याबाबत यावेळी चर्चा करण्यात आली. शासनाने कोविड रूग्णालयांना परवानगी देताना स्ट्रक्चरल ऑडिट, इलेक्ट्रिक ऑडिट, फायर ऑडिट विषयी जे नियम सांगितले आहेत ते पाळले जात आहेत की नाही यांची शहानिशा करूनच या रूग्णालयांना परवानगी दिली जाणार असल्याची माहिती आयुक्तांनी दिली. बालरूग्णांलयांनी संभाव्य तिसऱ्या लाटेच्या पार्श्वभूमीवर ऑक्सीजन, औषधे यांचा साठा करून ठेवण्याविषयीच्या सूचना यावेळी आयुक्तांनी केल्या.

अतिरिक्त आयुक्त तृप्ती सांडभोर यांनी बालरूग्णांलयांनी पॉझीटिव्ह येणाऱ्या लहान मुलांची माहिती पालिकेला कळविण्याबाबतच्या सूचना डॉक्टरर्सना दिल्या. यावेळी टास्क् फोर्सचे सदस्य डॉ.जय भांडारकर यांनी संभाव्य लाटेत गंभीर परिस्थितीमधील लहान मुलांवर उपचार .../२

## १ हजार ५९८ पात्र घरांना १ कोटी ४८ लाख २९ हजार ९१८ रुपयांचे अनुदान लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा

**दै.रायगड नगरी । पनवेल**





१७ मे २०२१ रोजी 'तोक्ते' चक्रिवादळाचा तडाखा पनवेल तालुक्याला बसला होता. वेगवान वारे आणि पावसामुळे जनजीवन विस्कळीत झाले होते. या वादळामुळे पनवेल तालुक्यातील १ हजार ६६८ आपदग्रस्तांच्या घरांची पडझड झालेली होती. घर पडझड झालेल्या आपदग्रस्तांपैकी पात्र १ हजार ५१८ आपदग्रस्तांना १ कोटी ४८ लाख २९ हजार ९१८ रुपयांचे अनुदान लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले असल्याची माहिती पनवेलचे तहसीलदार विजय तळेकर यानी दिली आहे.

'तोक्ते' चक्रिवादळामुळे पनवेल तालुक्यातील जनजीवन विस्कळीत झाले होते. वादळाने अनेक भाग प्रभावित झाला होता. झाडे, घरे, पत्रे यांचे नुकसान झाले होते. येथील नुकसानीची पाहणी विजय तळेकर, तहसीलदार, पनवेल यांनी केली होती. महाराष्ट्र शासन, शासन निर्णयानुसार १५% पडझड झाली असल्यास १५हजार रूपये अथवा नुकसानीची रक्कम, जेथे किमान २५% पडझड झाली असल्यास २५ हजार रूपये अथवा नुकसानीची रक्कम जेथे किमान ५०% पडझड झाली असल्यास ५० हजार रूपये अथवा नुकसानीची रक्कम यापैकी जी कमी असेल ती रक्कम मदत म्हणून प्रती घरे देणेबाबत शासन निर्णय झालेला आहे. त्यानुसार पनवेल तालुक्यातील १ हजार ५९८ पात्र घरांना शासन निर्णयाप्रमाणे १ कोटी ४८ लाख २९ हजार ९१८ चे देयके मंजूर झाली असून हे अनुदान लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले आहे. तसेच १८४ शेतक-यांचे एकूण २६.६७ हे.आर.क्षेत्राचे अंबा,भाजीपाला, केळी, शेवगा इ.चे पिकांचे नुकसान झाले होते. त्याना प्रती हेक्टरी रक्कम ५० हजार रूपये प्रमाणे नुकसानीच्या क्षेत्रानुसार एकूण रक्कम रुपये १२ लाख ६८ हजार ३०० रुपयांची मदत शेतकरी लाभार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये जमा करण्यात आली आहे.

> घर पडझड झालेल्या आपदग्रस्तांपैकी पात्र १ हजार ५१८ आपदग्रस्तांना १ कोटी ४८ लाख २९ हजार ९१८ रुपयांचे अनुदान लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आले तसेच पिकांचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना १२ लाख ६८ हजार ३०० रुपयांची मदत बँक खात्यात जमा करण्यात आली.
>
> **-विजय तळेकर- तहसिलदार, पनवेल**

## पनवेल शहर जिल्हा महिला काँग्रेसच्यावतीने दरवाढी विरुद्ध आंदोलन

**दै.रायगड नगरी । पनवेल**

महाराष्ट्र प्रदेश महिला काँग्रेस कमितीच्या आध्यक्षा संध्या ताई सव्वालाखे आणि मार्गदर्शक जिल्हा अध्यक्ष आर. सी घरत साहेब आदेशानुसार केंद्रातील भारतीय जनता पक्षाच्या चुकीच्या धोरणांमुळे शेतकऱ्यांचे कंबरडे मोडले आहे व शेतकऱ्याला देश धडीला लावले. कर्ज बाजारी करून ठेवले आहे. तसेच महागाई प्रचंड प्रमाणात वाढली आहे जीवनावश्यक वस्तूंचे भाव गगनाला भिडले आहेत.

पेट्रोल, डिझेल, एलपीजी गॅस व खाद्यतेलासह अनेक जीवनावश्यक वस्तूंची महागाई प्रचंड वाढली आहे या महागाईने सर्व सामान्य .../२



# नवरचनेची फसवी उडी

भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या मंत्रिमंडळाचा शपथविधी झाला तेव्हा १८ खाती आणि ती सांभाळणारे १४ मंत्री होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपल्या मंत्रिमंडळाची व्यापक फेररचना केली तेव्हा ५३ खात्यांसाठी एकूण ७७ मंत्री झाले. मंत्रिमंडळातील 'उपमंत्री' ही श्रेणी काही दशकांपूर्वी बाद झाली. आता कॅबिनेट, स्वतंत्र प्रभार असणारे राज्यमंत्री आणि कॅबिनेट मंत्र्यांना साह्य करणारे राज्यमंत्री अशी रचना असते. पंडितजींनंतर मोदींपर्यंत सर्वच पंतप्रधानांनी नव्या खात्यांना जन्म दिला आहे. ताजा विस्तार होण्याच्या एक दिवस आधी 'सहकार' हे आजवर केवळ राज्य पातळीवर असणारे पण अत्यंत महत्त्वाचे खाते जन्माला आले. ते गृहमंत्री अमित शहांकडे गेले आहे. स्वातंत्र्यानंतरच्या प्रवासात इंदिरा गांधी यांनी 'विज्ञान आणि तंत्रज्ञान', राजीव गांधी यांनी 'मनुष्यबळ विकास', अटलबिहारी वाजपेयी यांनी 'ईशान्य विकास', पृथ्वीविज्ञान' तसेच इतर पंतप्रधानांनीही अनेक खात्यांची भर घातली. बहुतेक केंद्रीय खात्यांमध्ये पुढे अनेक विभाग, महामंडळे, स्वायत्त संस्था असा मोठा पसारा असतो. संरक्षण किंवा अर्थखाते पाहिले तरी त्यांचा अंतर्गत पसारा इतर चार-पाच खात्यांपेक्षाही मोठा आहे. या पार्श्वभूमीवर पंतप्रधान मोदी हे खात्यांची फेररचना किंवा फेरजुळणी करणार, अशी चर्चा होती. त्यातील काही गोष्टी झाल्या आहेत. एकाच क्षेत्रासाठी काम करणारी खाती एकत्र आली तर त्यातून शक्तिव्यय व कालापव्यय टळून नवी कार्यसंस्कृती तयार होईल, हा यामागचा विचार आहे. मात्र, नव्या-जुन्या मंत्र्यांकडे दिलेल्या जबाबदाऱ्या पाहता या विचाराची तार्किक परिणिती कृतीत उतरल्याचे दिसत नाही. पंतप्रधानांची पक्ष, सरकार आणि नोकरशाही यांच्यावरची पकड पाहता असे व्हायला हरकत नव्हती. मात्र, तसे का झालेले नाही, हा प्रश्न भारताच्या सर्वांगीण व वेगवान प्रगतीचा विचार करणाऱ्या कोणाच्याही मनात येईलच. अमित शहा यांच्याकडे गृह व सहकार अशा दोन खात्यांची जोडी आल्याने त्यातून जे भलतेच सूचन होते आहे, ते तूर्त बाजूला ठेवले तरी सहकार हे कृषी, बँकिंग, कारखानदारी, वस्त्रोद्योग अशा अनेकानेक विषयांना पालाण घालणारे क्षेत्र आहे. अर्थविकासाचे एक वेगळे आणि आर्थिक समतेचे स्वप्न दाखवू शकणारे ते मॉडेल आहे. एकीकडे, सहकाराने अनेक राज्यांमध्ये विकासाचे चमत्कार घडविले आहेत. येथे सरदार पटेलांमुळे उभ्या राहिलेल्या 'अमूल'चे उदाहरण द्यावे लागेल. मात्र, दुसरीकडे, सहकार क्षेत्रापुढे अनेक कारणांनी अनेक आव्हाने उभी आहेत. सहकाराचा खासगी व भ्रष्ट स्वाहाकार हे त्यातले एक. महाराष्ट्राला ते चांगले परिचित आहे. असे असताना हे नवे खाते केवळ बेकायदा बाबी किंवा राजकीय गणिते मांडणार की आर्थिक नवरचनेचे काही विशाल नवसर्जन घडविणार, हे पाहावे लागेल. तितकी दूरदृष्टी आणि अर्थखात्याशी सतत संवाद ठेवण्याची तयारी अमित शहा यांना दाखवावी लागेल. हे होते का, हे काही काळातच स्पष्ट होईल. पंतप्रधानांनी आरोग्य व केमिकल्स किंवा शिक्षण व कौशल्य विकास ही खाती परस्परांना जोडली आहेत. इतरही काही उदाहरणे आहेत. मात्र, वाहतूक हा एक विषय घेतला तर रस्ते, रेल्वे, विमान, जल ही सारी वाहतूक एकत्र का आणली नाही, हे कळत नाही. त्याचप्रमाणे, कृषी या एकाच छत्राखाली मत्स्योत्पादन, पशुपालन, दुग्धविकास हे का आणले नाही? किंबहुना, ग्रामीण विकास या एका मोठ्या संज्ञेखाली कृषी, पंचायत राजसहित सारे विभाग एकत्र यायला हवे आहेत. दुसरीकडे, पंतप्रधानांनी हरदीप पुरी यांच्याकडे पेट्रोलियम व नगरविकास अशी जोडी दिली आहे. या दोन खात्यांचा परस्परांशी शहरी नागरिकांना भाववाढीने लुटणारे पेट्रोलियम खाते हा सोडून दुसरा कोणता संबंध आहे? तसेच, आरोग्य खात्याकडे इतर संबंधित विभाग येत असतील तर 'आयुष' हा आयुर्वेदाचाही विषय का जाऊ नये? त्याचे वेगळे खाते केवळ राजकीय कारणांसाठी कायम ठेवण्यात काय अर्थ आहे? त्याचप्रमाणे, सामाजिक विकास आणि महिला विकास ही खाती तरी वेगवेगळी कशासाठी? नारायण राणे यांच्याकडे सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योग असतील. मग त्यांच्याकडेच उद्योगांशी संबंध असणारे पोलाद हे खाते का नसावे? पीयूष गोयल यांच्याकडे गेलेल्या व्यापार व उद्योगमधील दुसरे एकाच मंत्र्याकडे का नसावे? नव्या खातेवाटपातील अशी आणखीही उदाहरणे देता येतील. फ्रान्समध्ये फक्त १६ तर कॅनडा, दक्षिण आफ्रिकेत ३४ खाती असतात. जर्मनीत सर्वांत कमी म्हणजे १३ खाती असतात. खात्यांच्या संख्येवर विकासाची गती अवलंबून नसते. किंबहुना, उलटेच होण्याची शक्यता अधिक. सामान्य नागरिकांच्या अपेक्षांची उंची आणि जीवनाचा वेग प्रचंड वेगाने वाढत असताना निर्णयप्रक्रिया व अंमलबजावणी विजेच्या वेगाने होण्याची गरज आहे. तसे होण्यासाठी खात्यांची आमूलाग्र फेररचना व्हायला हवी होती. मात्र, नवरचनेची ही उडी फसवी ठरली आहे.

# अनियमित पाणी पुरवठ्यासह रस्त्यावर येणाऱ्या दुर्गंधीसंदर्भात शिवसेनेने विचारला सिडकोला जाब

**दै.रायगड नगरी । पनवेल**

खांदा वसाहतीमध्ये गेल्या काही दिवसापासून होत असलेला अनियमित पाणी पुरवठा त्याचप्रमाणे अनेक ठिकाणचे ड्रेनेज जाम होवून त्याची दुर्गंधी परिसरात पसरल्याने रहिवाशांना नाक मुठीत धरुन ये-जा करावी लागत होती. या संदर्भात सिडकोच्या संबंधित अधिकाऱ्यांकडे तक्रारी करून सुद्धा या नागरी प्रश्नाकडे दुर्लक्ष केले जात असल्याबद्दल अखेरीस शिवसेनेने रस्त्यावर उतरुन सिडकोच्या अधिकाऱ्यांना जाब विचारला.



पनवेल पालिकेच्या खांदा वसाहती सेक्टर ९ येथे ड्रेनेज लाईन जाम झाल्याने परिसरातील दुर्गंधी वाढली, प्रवासात अडचण निर्माण झाली वय वृद्ध, स्त्री,लहान मुले प्रवास करू शकत नाही म्हणून अनेक त्रस्त नागरिकांनी शिवसैनिकां कडे धाव घेतली व ह्या विषयाची माहिती दिली. अशाच प्रकारे गेल्या काही दिवसापासून या परिसरात अनियमितपणे व कमी प्रमाणात पाणी पुरवठा होत होता.

याबाबत सिडकोचे अधिक्षक अभियंता मोहिले, सहाय्यक कार्यकारी अभियंता डेकाटे, ठेकेदार भागवत आदींना शहर प्रमुख सदानंद शिर्के यांच्यासोबत उपशहर प्रमुख दत्तात्रेय महामुलकर, उपशहर प्रमुख, संपत सुवर्णा, युवासेना उपविधानसभा अधिकारी सुशांत सावंत, महिला शहर संघटिका सौ सानिका मोरे, उपशहर संघटीका असमा खान, उपशहरसघटक संजीव गमरे, उपविभाग प्रमुख जयराम खैरे, शाखाप्रमुख पुंडलिक म्हात्रे, शाखाप्रमुख मंगेश पवार, शाखाप्रमुख अतुल घुग, शाखाप्रमुख अरविंद कासारे,युवासेना शहर चिटणीस कु. सुयश बंडगर,शिवसैनिक तानाजी घारे, भोर काका तसेच शिवसैनिक व खांदा वसाहती मधील अनेक नागरिकांनी रस्त्यावर उतरुन जाब विचारला असता सिडको अधिकाऱ्यांचे सध्या कोरोना काळात मनुष्यबळ कमी असल्याने वेळ होत असल्याचे म्हणत होते. परंतु लवकरच समस्यांचे निवारण करू असे आश्वासन त्यांनी दिले. त्याचप्रमाणे येत्या दोन दिवसात पाणी पुरवठा सुरळीत करू असे आश्वासन सुद्धा दिले.

# काशिद रस्त्यावरील जुना पूल धोकादायक : अपघाताची शक्यता

**दै.रायगड नगरी । कोर्लई**

अलिबाग-मुरुड रस्त्यावर काशिद बीच ते काशिद दरम्यान गेली पन्नास वर्षे जूना असलेल्या पूलाची पार दुरावस्था झालेली असून खचलेल्या अवस्थेत असून पावसाळ्यात वेळप्रसंगी केव्हाही पडण्याची शक्यता लक्षात घेऊन सार्वजनिक बांधकाम विभागाने तातडीने उपाययोजना करण्यात याव्यात. अशी मागणी वाहनचालक व ग्रामस्थांतून होत आहे.



अलिबाग-साळाव-मुरुड रस्त्यावर काशिद बीच ते काशिद दरम्यान अभिषेक काते यांच्या काशिद सी फेस हॉटेल जवळपास रस्त्यावर असलेल्या या जुन्या पूलाची गेल्या वर्षांपासून पार दुरावस्था झालेली असून पुलाचा स्लॅब खचून पडण्याची भिती व्यक्त केली जात आहे तसेच गेल्या काही दिवसांपासून या पूलाचा स्लॅब खचून रस्त्यावर खड्डा (खाच) पडून वेळप्रसंगी केव्हाही अपघा-ताची भिती व्यक्त केली जात आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकारी वर्गाने प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी करून यात तातडीने उपाययोजना करण्यात यावी. अशी मागणी वाहनचालक व ग्रामस्थांतून होत आहे.

# सुकापूर मधील गावदेवी मंदिरात चोरी ; आरोपी सीसीटिव्हीमध्ये कैद

**दै.रायगड नगरी । पनवेल**

देविंना अलंकार अर्पण करून त्यांना साजविले जाते ही आहे श्रद्धा ..... देवींच्या अंगावर परिधान केलेले अलंकार चोरी करणे ही आहे विकृती.... असाच प्रकार सुकापुर गावातील गावदेवी मंदिरात घडला आहे. येथील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असणाऱ्या या गावदेवी मंदिरात एका अज्ञात महिलेने देवीच्या दर्शनाचे निमित्त साधून देवीच्या अंगावरील दागिन्यांची चोरी केली आहे.

सदर घटना मंदिराच्या सीसीटिव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद झाली. या महिलेसोबत दोन लहान मुले यावेळी होती. तसेच या महिलेच्या डाव्या हातावर अपूर्वा असे नाव गोंदलेले आहे. सदर प्रकार ग्रामस्थांना कळताच ग्रामस्थांनी या महिलेचे फोटो सोशल मीडियावर व्हायरल केले. मात्र कोरोनामुळे तोंडावर मास्क बांधण्यात आले असल्यामुळे स्पष्टपणे ओळख जरी पटली नसली तरीही पोलीस तांत्रिक तपासाच्या आधारे या महिलेचा छडा लावतील, असा विश्वास ग्रामस्थांना आहे.

# तीर्थरूप डॉ श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा यांच्या मार्फत वृक्षारोपण



**दै.रायगड नगरी । पनवेल**

तीर्थरूप डॉ श्री नानासाहेब धर्माधिकारी प्रतिष्ठान रेवदंडा यांच्या मार्फत वृक्षारोपण - तीर्थरूप डॉ श्री अप्पासाहेब धर्माधिकारी व रायगड भूषण सचिनदादा धर्माधिकरी यांच्या मार्गदर्शनाखाली पनवेल तालुक्यातील पारगाव येथे वृक्षारोपण करण्यात आले.

यावेळी ग्रुप ग्रामपंचायत पारगाव सरपंच सौ अहिल्या बाळ-ाराम नाईक, सदस्य निशा रत्नदीप पाटील, मा उपसरपंच सुशील कांता तारेकर, मा सरपंच कवी तारेकर यांच्या उपस्थितीत वृक्ष लागवड करण्यात आली.

# लहान मुलांच्या दफनविधीसाठी जागा उपलब्ध करून देण्याची मागणी

**दै.रायगड नगरी । उरण**

नवघर गावात दफनभूमीची समस्या अधिकच बिकट होत चालली आहे. दफनभूमीसाठी पुरेशी योग्य जागा उपलब्ध नसल्याने लहान मुलांच्या अंत्यसंस्काराचा,दफनविधीचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. त्यामुळे लहान मुलांचा अंत्यविधी दफनभूमी साठी जागा उपलब्ध करून देण्याची मागणी ग्रामस्थ मंडळ अध्यक्ष जयप्रकाश नारायण पाटील यांनी पत्रव्यवहाराद्वारे सिडको, ग्रामपंचायतचे सरपंच, तह-सीलदार, गटविकास अधिकारी, महावितरण कार्यालय यांच्याकडे केली आहे. नवघर गावात सिडकोने बांधलेल्या स्मशानालगत विद्युत डीपीचे काम चालू आहे. त्या ठिकाणी ग्रामपंचायत किंवा सिडकोकडून लहान मुलांचा दफनभूमीत जागा उपलब्ध करून न दिल्याने या ठिकाणी असलेल्या मोकळ्या जागेत नवघर गावातील ग्रामस्थांना दफन करावे लागत आहे. परंतु या ठिकाणी डीपी चे काम चालू आहे. तसेच सदर चालू असलेल्या डीपीची जागा बदलून दुसऱ्या जागेवर बांधावी किंवा नवघर ग्रामस्थांना लवकर लहान मुलांसाठी दफनभूमीची जागा उपलब्ध करून द्यावी. जोपर्यंत लहान मुलांना दफनभूमीसाठी जागा उपलब्ध होत नाही तोपर्यंत काम थांबविण्यात यावे अशी मागणी जयप्रकाश पाटील यांनी सरपंच,तहसीलदार, सिडको कार्यालय, महावितरण वीज कार्यालया यांच्याकडे पत्रव्यवहाराद्वारे केले आहे.

पृष्ठ क्र.१ वरुन...

## आरोग्याच्या जास्तीत जास्त सेवा, सुविधा उपलब्ध करणार

सचिन कदम आदि मान्यवर आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

उद्घाटन प्रसंगी पालकमंत्री आदिती तटकरे म्हणाल्या की तालुका डोंगरी आहे त्यामुळे ग्रामीण भागातील माझ्या नागरिकांना जास्तीत जास्त आरोग्य सेवा मिळाव्यात व प्राथमिक आरोग्य केंद्राची मागणी व तटकरे यांची ईच्छा यामुळे हे प्राथमिक आरोग्य केंद्र येथे आपल्याला शासनाकडून उभारता आले आहे. त्याचा लाभ येथील रूग्णांना होणार आहे जास्तीत जास्त आरोग्य सुविधा उपलब्ध करण्याचा प्रयत्न करून माझ्या आमदार निधीतून पुढच्या कालावधीतही आरोग्यावर५०% खर्च करण्याचाप्रयत्न करेन. असे आश्वासन यावेळी दिले.

## प्रशासनाला मित्र माना, आम्हीही डॉक्टरर्सना सर्वतोपरी मदत करू

करण्यासाठी प्राथमिक स्वरूपातील ट्रेनिंग परवानगी मिळणाऱ्या रूग्णालयातील स्टाफला देणे गरजेचे असल्याचे सांगितले. तसेच महापालिकेने देखील सर्व सुविधांनी युक्त असणाऱ्या एम.जी.एम सारख्या रुग्णालयांशी समन्वय साधल्यास नागरिकांना एका छताखाली चांगल्या सुविधा मिळू शकतील, अशा सूचना दिल्या.

एम.जी.एम.रूग्णालय देखील तिसऱ्या लाटेच्या दृष्टीकोनातून तयारी करत असल्याचे एम.जी.एम.रूग्णालयाचे डॉ.विजय कमले यांनी सांगितले. संभाव्य तिसऱ्या लाटेमध्ये पालिकेला आम्ही संपूर्ण सहकार्य करू असे आश्वासन यावेळी सर्व डॉक्टरांच्यावतीने देण्यात आले. या ऑनलाईन बैठकिस उपायुक्त सचिन पवार, मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी, वैद्यकिय अधिकारी डॉ. रेहाना मुजावर, डॉ. पूनम जाधव, टास्क फोर्सचे सदस्य, इतर तज्ज्ञ डॉक्टरर्स उपस्थित होते.

## पनवेल शहर जिल्हा महिला काँग्रेसच्यावतीने दरवाढी विरुद्ध आंदोलन

जनतेला जगणे कठीण झाले आहे. या जीवघेण्या महागाई विरोधात पनवेल शहर जिल्हा महिला काँग्रेसच्यावतीने उपविभागीय अधिकारी यांना निवदेन देवून आंदोलन करण्यात आले सदर कार्यक्रमास पनवेल शहर जिल्हा महिला निरीक्षक कविता कटकधोंड, पनवेल शहर जिल्हा महिला अध्यक्षा निर्मला म्हात्रे, युवक आध्यक्ष हेमराज म्हात्रे; ब्लॉक अध्यक्षा आरती ठाकुर, सोनिया सोहोटा, उपाध्यक्षा अनुपमा सिंग, सरचिटणीस निता शेणाई, विनया पाटील, कलावती माळी, सुधीर मोरे, अभिजित मुडक्कल, ॲड. सुधा स्वामी, शहीन पटेल, सुनिता सोनार, आरिफा पटेल, मोडक व आदि महिला उपस्थित होत्या.


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमूद असलेल्या मालकाकडून कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात खालील नमूद पत्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमीन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे : नालधे, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमीन मिळकत**

| मालकाचे नांव | सर्व्हे नं. | प्लॉट नं. | क्षेत्र | आकार | |
|---|---|---|---|---|---|
| | | | चौ.मी. | रुपये | पैसे |
| विनायक शरदचंद्र कानडे | ७९ | २५४ | १४१ | १४ | १० |
| सरिता विनायक कानडे | व त्यावरील बांधलेले घर क्र.२५४ ब क्षेत्र ४८.५७ चौ.मी | | | | |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता : मु.पो.कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१

सही/-
ॲड.भुपेश तानाजी पेमारे
दि.१०/०७/२०२१
मो.नं.९१५८२७७७२८

### जाहीर नोटीस

आमच्या अशिलांनी खालील मिळकत विकत घेण्याचे मान्य केले आहे. खालील वर्णनाची मिळकत १) श्री.अशोक तुकाराम घरत, २) श्री.कल्पेश मनोहर घरत, ३) सौ.मनिषा मनोहर घरत, ४) सौ.सुलोचना चंद्रकांत पाटील, ५) सौ.अपेक्षा उर्फ वनिता सुर्यकांत पाटील यांच्या ताबेकब्जात असल्याने त्यांच्याकडून आमचे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**संपादीत मिळकतीचे वर्णन**

**मौजे : पेंधर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| मौजे | भूधारणा पद्धती | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| खोपटे | वर्ग १ | ५१ | ५ ब १ | ०-२५-७० पैकी ०-०६-० | २.९१ |

तरी वरील मिळकतीबाबत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा-कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, ॲटॅचमेंट, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत खालील पत्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अथवा प्रत्यक्ष संपर्क करावा. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री करण्याचा व्यवहार पूर्ण करतील आणि वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.
पनवेल
दि.०९/०७/२०२१

सही/-
ॲड.अजित धनराज म्हात्रे
पायोनिअर सोसायटी, ग्राऊंड फ्लोअर,
स्वामी नित्यानंद मार्ग, युविका हॉटेल
समोर, ठाणा नाका, पनवेल

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमीन मिळकत ही त्यांचे ७/१२ उताऱ्यावर नमूद असलेल्या मालकाकडून कायमचे खरेदीखताद्वारे विकत घेण्याचे निश्चित केलेले आहे. या मिळकती संदर्भात कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा खरेदीखत, साठेकरार, विक्री, गहाण, दान, लिज, बक्षिसपत्र, चार्ज, ताबेकब्जा, कुळमुखत्यार पत्र वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास, आणि किंवा त्यांची आमचे अशिलांच्या खरेदीच्या व्यवहारास हरकत असल्यास, संबंधित व्यक्ती किंवा संस्थांनी आपली हरकत कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरुपात खालील नमूद पत्यावर ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांत कळवावे. मुदतीमध्ये कोणाचीही हरकत न आल्यास माझे अशिल खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या जमीन मिळकतीच्या मालकाबरोबर आपला खरेदी व्यवहार पूर्ण करतील. मुदत बाह्य हरकती विचारात घेतल्या जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मौजे : वारे, ता.कर्जत, जि.रायगड येथील जमीन मिळकत**

| सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|
| १०० | १२ | ०-७६-० | ०.४४ |
| १२६ | १० अ | १-०९-५० | ०.४५ |
| १२७ | ५ अ | ०-४२-५० | ३.६९ |

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
कार्यालयीन पत्ता : मु.पो.कशेळे,
कर्जत-मुरबाड रोड, सरकारी दवाखान्या समोर,
ता.कर्जत, जि.रायगड ४१०२०१

सही/-
ॲड.भुपेश तानाजी पेमारे
दि.१०/०७/२०२१
मो.नं.९१५८२७७७२८

मा.एन.आर.इंदलकर सो.कोर्ट
अर्जदारातर्फे वकील
श्री.गुरुनाथ दत्ता भगत

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.न्यायदंडाधिकारी सो.वर्ग १ यांचे न्यायालयात
फौ.चौ.अर्ज नं.६५२/२०२१
नि.नं.७/ड
ने.ता.१२/०८/२१

श्री.रुपेश बाळकृष्ण म्हात्रे
वय : ३९ वर्षे, धंदा : नोकरी
रा.खुटारी गाव, घर नं.१००६, पो.तळोजे मजकूर,
ता.पनवेल, जि.रायगड-४१०२०८
मो.नं.९८२११९२९६१ अर्जदार
विरुद्ध
निबंधक जन्म व मृत्यू नोंदणी
महानगरपालिका पनवेल
रोहिंजण विभाग, ता.पनवेल, जि.रायगड सामनेवाले

तमाम जनतेस या जाहीर नोटीशीद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार श्री.रुपेश बाळकृष्ण म्हात्रे यांचा जन्म तारीख ०७/०९/१९८२ रोजी मौजे : खुटारी, पो.तळोजे मजकूर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे झालेला आहे. तशी जन्माची नोंद होवून मिळण्यासाठी फौजदारी चौकशी अर्ज क्र.६५२/२०२१ दाखल केला असून सदरच्या नोंदीबाबत कोणासही कसल्याही प्रकारची हरकत घ्यावयाची असल्यास नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांचे आत घ्यावी. कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास कोणासही काही बोलायचे नसून असे समजून मा.कोर्ट अर्जदाराचे लाभात योग्य तो आदेश देईल याची नोंद घ्यावी.
स्थळ : पनवेल
दिनांक : ०९/०७/२०२१

सही/- क.लिपीक फौ.न्याया. पनवेल — कोर्टाचा शिक्का — सही/- सहा.अधिक्षक फौ.न्याया. पनवेल


### वाचकांना विनम्र सूचना

**दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.**


### गाळा विकणे आहे

**पनवेल महानगरपालिका हद्दीत मिरची गल्लीत रोड टच डबल शटर (६५० बिल्टअप) एरीयाचा गाळा विक्री करणे आहे.**

**संपर्क : ९३२१५९२११३/८१०४४७७४०**


हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले.
दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

# संक्षिप्त...

## पाले खु.येथे महिला आणि विद्यार्थी आर्थिक साक्षरता अभियान संपन्न

**दै.रायगड नगरी । खांब-रोहा**

राष्ट्रीय क्रुषी आणि ग्रामीण विकास बँक अंतर्गत नाबार्ड स्थापना दिनाचे औचित्य साधून रा.जि.मध्यवर्ती सह.बँक अलिबाग कोलाड शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने महिला आणि विद्यार्थी आर्थिक व डिजिटल साक्षरता अभियान कार्यक्रम पाले खु. येथे संपन्न करण्यात आला.

या अभियानप्रसंगी कोलाड आरडीसीसी शाखाधिकारी सौ.भावना सरफळे,संजय शेळके व मोठ्या संख्येने बचत गटातील महिला तसेच जेष्ठ नागरिक उपस्थित होते.या कार्यक्रमात शाखाधिकारी सौ. भावना सरफळे यांनी बँकेतर्फे राबविण्यात येत असलेल्या महिला आणि विद्यार्थी आर्थिक व डिजिटल साक्षरता अभियानाचे महत्त्व पटवून दिले. तर शाळेतील विद्यार्थी, शेतकरी बांधव व बचत गटातील महिलांना यांच्या व्यवसाय ब्रुद्धी व प्रगतीसाठी अल्पदर कर्जाविषयी तसेच बँकेतील सर्व प्रकारच्या योजनांबद्धल माहिती व मार्गदर्शन करून अल्पबचतीचे महत्त्व,गरज व फायदे याबाबत माहिती सांगितली.तर महिला बचत गटांना प्रोत्साहन देण्यासाठी तसेच त्यांना सक्षम करण्यासाठी आरडीसी बँक नेहमीच सहकार्य करीत असल्याचे आवर्जून सांगितले. यावेळी उपस्थितीतांना गुलाबपुष्प, मास्क तसेच खाऊचे वाटप करण्यात आले.सध्या सुरू असलेल्या कोरोना महामारीचे पार्श्वभूमीवर कोरोनाचे शासकीय नियवलीचे पालन करून सदरचे अभियान यशस्वीरीत्या संपन्न करण्यात आले.

## पावसाच्या आगमनाने शेतीच्या कामांना वेग बळीराजा सुखावला

**दै.रायगड नगरी । तळा**

७ जूनला कोकणासह सर्वत्र मान्सून ने हजेरी लावली. उन्हाळ्याच्या उकाड्यातून दिलासा मिळत असताना शेतकरी वर्गाची पेरणीसाठी कामे आटोपली होती.

पाऊस छान पडत असल्यामुळे रोपेही सुंदर उभी राहिली असताना ऐन लावणी च्या टाईमात पावसाने दडी मारली आणि शेतकरी राजाला चिंतेत टाकले. काही ठिकाणी तर शेतात पाणी नसल्या मुळे रोपे सुकू लागली होती. आठ एक दिवस दडी मारलेल्या पावसाचे काल सायंकाळी सुंदर आगमन झाले आणि चिंतेत पडलेला शेतकरी सुखावला आहे. आज सर्वत्र लावणीची कामे जोरात सुरू झाली आहेत. सुरू झालेल्या पावसामुळे शेतकरी वर्गामध्ये उत्साहाचे वातावरण दिसत आहे.

## अखेर..चिंचपाडा येथील चार रस्त्यावर बसविले गतिरोधक

**दै.रायगड नगरी । पनवेल**

चिंचपाडा येथील उड्डाण पुलाखाली मुख्य चार रस्त्यावर पनवेल बाजूकडून उरणच्या दिशेने जाणाऱ्या, कळंबोली-पनवेल, करंजाडे-पनवेल च्या दिशेने जाणाऱ्या रस्त्यावर गतिरोधक नसल्यामुळे अपघात घडत होते. मात्र गतिरोधक उभारण्यासाठी पनवेल शहर वाहतूक पोलीस, सिडको अधिकाऱयांना पत्रव्यवहार केला होता. त्यानुसार सिडको व नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ विभागाने या रस्त्यावर गतिरोधक बसविले आहे. त्यामुळे अपघाताला आला बसणार आहे. सिडकोद्वारे नव्याने विकसित होणाऱ्या करंजाडे वसाहतीच्या बाजूलाच चिंचपाडा येथे उड्डाणपुलाच्या बाजूला चार रस्ते आहेत. करंजाडे ते कळंबोली-पनवेल, कळंबोली ते उरण- पनवेल, पनवेल-उरण असा चार रस्ता आहे. मात्र या रस्त्यावर चारही बाजूने वाहने हे भरधाव वेगाने येत असतात. यामुळे येथे अपघात होऊन दुखापत होण्याची शक्यता आहेतच. नुकताच दुचाकीस्वार उरणच्या दिशेने जात होता. त्यावेळी पनवेल बाजूकडून उरणच्या दिशेने जात असताना रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करून बेदरकारपणे व हयगयीने अतिवेगाने वाहन चालविल्याने त्याला स्कॉर्पिओवरील ताबा सुटल्याने मोठा अपघात घडला होता.


### जाहीर नोटीस

आमच्या अशिलांनी खालील मिळकत विकत घेण्याचे मान्य केले आहे. खालील वर्णनाची मिळकत कै.सावित्री आत्माराम कदम (मयत) चे वारस श्रीमती.जयश्री दगडू दळवी यांच्या ताबेकब्जात असल्याने त्यांचेकडून आमचे अशिलांनी विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**संपादीत मिळकतीचे वर्णन**
**मौजे : पेंधर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड**

| मौजे | अॅवार्ड नं./युनिट केस नं. | सर्व्हे नं. | हिस्सा नं. | क्षेत्र हे.आर.पॉ. | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|---|
| पेंधर | २००८ | २५० | २ | ०-२२-० | १.४४ |
| | | २६४ | ७ | ०-२९-० | २.०० |

सदरहू संपादीत मिळकतीचे बदल्यात सिडको प्राधिकरणाकडून १२.५ टक्के गावठाण विस्तार योजनेंतर्गत तळोजा सिडको फाईल नं.१०८२ या द्वारे दुसरेपक्षी यांना सिडको कडील मौजे : तळोजा, नोड : तळोजा, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे खालील वर्णनाचा भूखंड इरादीत करण्यात आलेला आहे.

**भूखंडाचे वर्णन**

| मौजे / नोड | क्षेत्र चौ.मी. |
|---|---|
| तळोजा | ४५० चौ.मी. |

तरी वरील मिळकतीबाबत अन्य कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ, वहिवाट, ताबा-कब्जा, इजमेंट, साठेकरार, फरोक्त, गहाण, दान, बक्षिस, चार्ज, अॅटॅचमेंट, वगैरे कोणत्याही प्रकारचा हक्क-हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून २१ दिवसांच्या आत खालील पत्यावर प्रथमदर्शनी पुराव्यासह लेखी हरकती रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्यात अथवा प्रत्यक्ष संपर्क करावा. याप्रमाणे मुदतीत हरकती न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा विक्री करण्याचा व्यवहार पूर्ण करतील आणि वरील मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत, याची नोंद घ्यावी.

पनवेल
दि.०९/०७/२०२१

**सही/-**
**अॅड.शशिकांत काळू म्हात्रे**
**पायोनिअर सोसायटी, ग्राऊंड फ्लोअर, स्वामी नित्यानंद मार्ग, युविका हॉटेल समोर, ठाणा नाका, पनवेल**


# पावसाने दिली जरी ओढ... शेतकऱ्यांनो नका लावू जीवाला घोर... कर्जत प्राथमिक कृषी केंद्राचा मौलिक सल्ला

पावसाने खंड दिल्याने शेतकरी वर्ग चिंतातूर झालेला आहे. काही ठिकाणी भात पिकाची लावणी खोळंबली. अपुऱ्या पाण्यामुळे काही ठिकाणी जमिनीला भेगाही पडल्या आहेत. रोग व किडींचा प्रादूर्भाव झाल्यास काय करावे, असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे. परंतु जीवाला घोर लावून न घेता शेतकऱ्यांनी प्राथमिक कृषी संशोधन केंद्र, कर्जत येथील विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ डॉ.रवींद्र मर्दाने यांनी दिलेल्या मार्गदर्शक सल्लूयाचा उपयोग करावा. हे मार्गदर्शन शेतकऱ्यांना नक्कीच मार्गदर्शक ठरेल.

भात रोपवाटिकेत ताण बसत असल्यास बाह्य स्त्रोतातून (विहीर /बोअर.. इ) पाणी देण्याची व्यवस्था करावी. तसेच पुनर्लागवड केलेल्या भात खाचरामध्ये पहिल्या ३० दिवसापर्यंत पाण्याची पातळी २.५ ते ५ से.मी. पर्यंत गरजेनुसार बाह्यस्त्रोतातून पाण्याची उप-लब्धता करून नियंत्रित करावी.

पुढील काही दिवस जिल्ह्यातील पावसाचा अंदाज घेऊनच भात लागवडीची कामे हाती घ्यावीत. शक्य असल्यास बाह्य स्त्रोतातून पाण्याची उपलब्धता करून भात पुनर्लागवड करावी अन्यथा पुढे ढकलावी. पुनर्लागवड केलेल्या भात खाचरामध्ये लष्करी अळीचा प्रादूर्भाव दिसून येण्याची शक्यता असल्याने किडीच्या प्रादूर्भावाचे निरीक्षण करावे. त्याच्या नियंत्रणासाठी क्लोरपायरीफॉस १.५ टक्के भुकटी वारा शांत असताना धुरळावी. शेतातील बांध तणमुक्त ठेवावे.

पाणथळ भागातील भात पिकावर खाचरात पाणी साचून राहिल्यामुळे सुरळीतील अळीचा प्रादूर्भाव होण्याची शक्यता असल्याने किडीच्या प्रादूर्भावाचे सातत्याने निरीक्षण करावे. त्याच्या नियंत्रणासाठी बाहेरून पाणी उपलब्ध करणे शक्य असल्यास भात खाचरात असलेले पाणी बांधून ठेवावे. नंतर कीडग्रस्त पिकावर एक दोर आडवा धरून ओढत न्यावा, त्यामुळे सुरळ्या एका ठिकाणी जमा झाल्यावर नष्ट कराव्यात व नंतर शेतात नवीन पाण्याची साठवण करण्याची व्यवस्था करावी. भात पिकावर कोडकिडीचा आणि पाने गुंडाळणाऱ्या अळीचा प्रादूर्भाव पुनर्लागवडीनंतर पिकाच्या वाढीच्या अवस्थेत दिसून येतो. खोडकिडीच्या व्यवस्थापनासाठी कारटॅप हायड्रोक्लोराईड ४ टक्के दाणेदार ७.५ किलोग्रॅम किंवा क्लोरनाट्रोनीलिपोल ०.४ टक्के दाणेदार ४ किलोग्रॅम किंवा फिप्रोनील ०.३ टक्के दाणेदार ८.३ किलोग्रॅम प्रती एकर या प्रमाणात दाणेदार कीटकनाशकाची पहिली मात्रा पुनर्लागवडीपूर्वी २-३ दिवस अगोदर जमिनीत पुरेसा ओलावा असताना रोपवाटिकेमध्ये द्यावी.

नागली, वरी रोपवाटिकेत लष्करी अळीचा प्रादूर्भाव दिसून आल्यास वर नमूद केल्याप्रमाणेच नियंत्रण करावे. नारळाच्या लहान रोपांवर कोंब कुजव्या रोगाचा प्रादूर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी कुजलेला कोंब साफ करून त्यामध्ये १ टक्का बोर्डो मिश्रण मिसळावे. नारळावर गेंड्या भुंग्याचा प्रादूर्भाव शेंड्यामध्ये येणाऱ्या नवीन कोंबावर दिसून येतो. या भुंग्याची पैदास शेणखतांच्या खड्डयाजवळ होत असल्याने बागेजवळ शेणखताचे खड्डे असल्यास अशा खड्ड्यात दर दोन महिन्यांनी १.५ टक्का क्लोरोपायरीफोसची भुकटी मिसळावी. बागेमध्ये २÷२÷२ फूट आकाराचे फसवे खड्डे प्रती एकरी ४ खोदावे, त्यात शेणखत भरून ठेवावे व शेणखतामध्ये १.५ टक्का क्लोरोपायरीफॉस भुकटी मिसळावी. त्यामुळे मादी भुंग्यानी घातलेल्या अंड्यातून बाहेर येणाऱ्या अळ्यांचा नाश होईल. बाग स्वच्छ ठेवावी व किडींच्या सर्वेक्षणासाठी बागेत गेंड्या भुंग्याचा गंध सापळा बसवावा.

पावसाची उघडीप असल्याने भेंडी व अन्य वेलवर्गीय भाजीपाला पिकावर गोगलगाईचा प्रादूर्भाव दिसून आल्यास गोगलगाई गोळा करून १० टक्के मिठाच्या द्रावणामध्ये टाकून नष्ट कराव्यात. प्रादूर्भाव जास्त असल्यास नियंत्रणासाठी ८ टक्के रिठाचे द्रावण ८०० ग्रॅम रिठा भिजतील इतक्या शक्यतो गरम पाण्यात भिजत घालून ६-७ तासांनी भिजलेल्या रिठयाचे द्रावण वस्त्रगाळ करून प्रती १० लिटर पाण्यात मिसळून भाजीपाला रोपांवर तसेच शेतातील बांधावरील गवतावर फवारणी करावी. (सदर रिठयाच्या द्रावणाची फवारणी नागली पिकावर करू नये ). वांगी, मिरची, टोमॅटो, वेलवर्गीय भाजीपाला पिकावरील मर रोगाच्या नियंत्रणासाठी ट्रायकोडर्मा जैविक बुरशीनाशकाची ५ ग्रॅम प्रति लिटर पाणी याप्रमाणे द्रावण तयार करून रोपांच्या बुंध्याशी आळवणी करावी. पुनर्लागवड करतेवेळी डायमिथोएट १ मिली प्रति लिटर पाण्याच्या द्रावणात ५ मिनिटे बुडवावी. लागवड सरी वरंब्यावर ६० ÷ ६० सेमी किंवा ९०÷६० सेमी अंतरावर करावी. लागवडीच्या वेळी ७५० ग्रॅम चांगले कुजलेले शेणखत, ४ ग्रॅम युरिया, ११ ग्रॅम सिंगल सुपर फॉस्फेट आणि ३ ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश किंवा सुफला १५:१५:१५ खते द्यावयाची असल्यास १० ते १२ ग्रॅम प्रति रोप याप्रमाणे खताची मात्रा द्यावी. काकडी, दोडका, कारले, दुधीभोपळा,घोसाळे यासारख्या वेलवर्गीय पिकांची लागवड करून १०-१२ दिवसांनी बुरशीजन्य रोग टाळण्यासाठी ट्रायकोडर्मा ५० ग्रॅम १० लिटर पाण्यात मुळावर चूळ भरावी तसेच वेलींना योग्य आधार द्यावा व वेलवर्गीय पिकावर रसशोषक किडींचा प्रादूर्भाव रोखण्यासाठी एकरी २०-२५ पिवळ्या, निळ्या रंगाचे चिकट सापळे लावावे. काळीमिरीच्या वेलीवर करपा रोगाचा प्रादूर्भाव दिसून आल्यास कार्बन डाजियम १ ग्रॅम प्रति एक लिटर पाण्यात मिसळून उघडीप असताना फवारणी करावी. पावसाळ्यात मोगरा व सोनचाफा फूलपिकामध्ये मूळकूज रोगाचा प्रादूर्भाव दिसून आल्यास ट्रायकोडर्मा २ किलोग्रॅम प्रति एकर या प्रमाणात झाडाच्या मुळाशी आळवणी करावी.

नवीन फळबाग (आंबा, चिकू, काजू ) कलम लागवडीनंतर पानांवर अळीचा प्रादूर्भाव दिसून आल्यास त्यासाठी डायमिथोएट ३० टक्के प्रवाही १.५मिली प्रति लिटर पाण्यातून फवारणी करावी. बुरशीजन्य रोगामुळे होणाऱ्या चिकू फळगळतीच्या नियंत्रणासाठी बाग स्वच्छ ठेवावी, हवा खेळती राहील व सूर्यप्रकाश जमिनीवर पोहोचेल, असे बघावे. झाडाच्या भोवती ट्रायकोडर्मा हे जैविक बुरशीनाशक २ किलोग्रॅम प्रति एकर प्रमाणात झाडाभोवती द्यावे आणि मँटलेकाजिल + म्यानकोझेब २.५ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पशुपालन करणाऱ्या शेतकऱ्यांनी गोठे स्वच्छ, हवेशीर व कोरडे ठेवावे. शेळ्यांना सर्वसाधारण एका वेळी २०० ते २५० ग्रॅम खुराक, ३ ते ४ किलो हिरवी वैरण आणि १.५ किलो वाळलेली वैरण प्रतिदिन द्यावी.

**डॉ रवींद्र मर्दाने**
**विस्तार शिक्षण शास्त्रज्ञ,**
**उत्तर कोकण किनारपट्टी विभाग,**
**प्रादेशिक कृषी संशोधन केंद्र, कर्जत**

# पोटाची खळगी भरण्यासाठी आदिवासी पेलतात खडतर आव्हाने

**दै.रायगड नगरी । माथेरान**



माथेरानच्या पायथ्याशी बहुतेक आदिवासी वाड्या असून बाराही महिने या लोकांचे जीवनमान हे केवळ माथेरान याच एकमेव पर्यटनस्थळावर अवलंबून असते. काही वाड्या ह्या खालापूर हद्दीत येत आहेत. परंतु रोजगाराच्या शोधात पूर्वीप-ासून ही मंडळी माथेरान मध्ये येऊन आपली आणि कुटुंबाची उपजीविका भागविण्यासाठी डोंगर दऱ्यातून अवघड अशा उभ्या डोंगराला आव्हान देत निमुळत्या पायवाटेने जीवघेणा प्रवास करत इथे येत असतात. कुणी मोलमजुरी करण्यासाठी तर कुणी हंगामाप्रमाणे भाजीपाला, मासे विक्रीसाठी घेऊन येतात. तर काहीजण घोड्यांसाठी लागणारे गवत घेऊन येतात. विशेषतः पावसाळ्यात या डोंगर रांगांतून अवघड निमुळत्या पायवाटेने येताना एका बाजूला उंच उंच कडा त्यावरून एखादी दरड कोसळण्याची दाट शक्यता आणि एका बाजूला जवळपास दोन ते अडीच हजार फूट खोल दरी असा हा खडतर प्रवास करणे म्हणजे एकप्रकारे वेळप्रसंगी मृत्यूला आमंत्रण देण्यासारखे आहे. या आदिवासींमध्ये बहुतांश लोक हे पनवेल तालुक्यातील धोदानी गावातून सनसेट पॉईंट मार्गे येत असतात. जवळपास दोन ते अडीच किलोमीटरचा हा प्रवास अन तेसुद्धा डोक्यावर गवत अथवा भाजीपाला घेऊन डोंगर चढणे म्हणजे जणूकाही कटू जीवनातील कठीण चढउतार जगण्यासाठी एकप्रकारे अग्निदिव्य पार करण्यासारखेच म्हणावे लागेल यात शंकाच नाही.

धोदाणी येथील आदिवासी लोकांना पनवेल बाजारपेठ सुध्दा हाकेच्या अंतरावर आहे. पनवेल-धोदाणी मार्गे माथेरान हा मार्ग उपलब्ध झाल्यास या आदिवासींना खूपच सोयीस्कर होणार असून यामुळेच भविष्यात इथला पर्यटन व्यवसाय सुध्दा वृद्धिंगत होण्याची शक्यता नाकारता येत नाही. सनसेट पॉईंटच्या पायथ्याशी असलेल्या आदिवासी वाड्यांपर्यंत उत्तम प्रकारे पायवाट उपलब्ध आहे हा मार्ग बनविण्यासाठी आदिवासी बांधव सुध्दा इच्छुक असून शासनाने ह्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या विषयाला हात घातल्यास निश्चितपणे इथले पर्यटन बहरण्याची चिन्हे स्पष्ट होऊ शकतात.

मागील काळात माथेरान मधील होतकरू तरुणांनी या ठिकाणी श्रमदान करून शासनाचे लक्ष वेधण्याचा पुरेपूर प्रयत्न केला होता. तर पनवेल-धोदाणी मार्गे माथेरान अशाप्रकारे एमएमआरडीएच्या माध्यमातून फिनिक्युलर रेल्वे सेवा सुरू व्हावी यासाठी माजी नगराध्यक्ष मनोज खेडकर यांनी सुध्दा आपल्या परीने प्रयत्न केले होते आणि त्यास जवळजवळ यश सुध्दा आले होते परंतु मतांच्या राजकारणापायी तालुक्यातील काही मंडळींनी या महत्वाकांक्षी प्रकल्पास विरोध केल्यामुळे हा जवळपास शंभर कोटी रुपयांचा तालुक्यातील सर्वात मोठा प्रकल्प पूर्ण होऊ शकला नाही.तर सातत्याने यासाठी येथील सामाजिक कार्यकर्ते जनार्दन पार्टे ह्यांनी सुध्दा शासनाकडे निवेदनाद्वारे पाठपुरावा केला होता. नगराध्यक्षा प्रेरणा सावंत यांनी सुध्दा याबाबत एमएमआरडीए च्या वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत चर्चा केली असून हा प्रकल्प पूर्ण होण्यासाठी पाठपुरावा करीत आहेत. भविष्यात शासनाने माथेरान पर्यटनस्थळासाठी विचार केल्यास फिनिक्युलर रेल्वे सेवा सुरू होऊ शकते.मोटार वाहने सुध्दा येथून येऊ शकतात त्यामुळे आदिवासींच्या रोजगारा सोबतच इथल्या स्थानिकांना चांगल्या प्रकारे रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात.


मा.मुजावर सो.
अॅड.रेणुका मि. पाटील, पनवेल
अर्जदारांचे वकील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे न्यायालयात
दि.चौ.अर्ज नं.७८३/२०२१
नि.नं.८
ने.ता.१३/०८/२१

कै.भानुदास सिताराम शिंदे तर्फे वारस
१) श्री.प्रमोद भानुदास शिंदे
वय : ३७ वर्षे, धंदा : व्यवसाय
रा.मोराज रिव्हरसाईड पार्क, बिल्डींग नं.पी-१
रुम नं.०३, तळमजला, तक्का,
ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

सौ.कल्पिता कौशल यादव
वय : ३९ वर्षे, धंदा : गृहिणी
रा.नुतन प्रवर्तक, को.हौ.सो., रुम नं.८०२५,
बिल्डींग नं.२००, कन्नामवार नगर नं.२,
विक्रोळी (पुर्व), मुंबई ४०००८३ — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीद्वारे असे कळविण्यात येते की, कै.भानुदास सिताराम शिंदे यांचे निधन दि.०६/०७/२०२० रोजी रा.मोराज रिव्हरसाईड पार्क, बिल्डींग नं.पी-१, रुम नं.०३, तळमजला, तक्का, ता.पनवेल, जि.रायगड येथे झालेले असून कै.भानुदास सिताराम शिंदे यांची पत्नी कै.भारती भानुदास शिंदे या दि.०४/०४/२०१९ रोजी मयत झालेल्या आहेत. तसेच कै.भानुदास सिताराम शिंदे यांची आई कै.अनुसया सिताराम शिंदे या दि.०३/०७/२००९ रोजी मुंबई येथे मयत झालेल्या आहेत. अर्जदार यांनी कै.भानुदास सिताराम शिंदे यांच्या सामाईक मालकीची खालील वर्णनाची मिळकतीचे वारसपत्र मिळण्यासाठी अर्ज केलेला आहे.

**सदनिकेचे वर्णन खालीलप्रमाणे**

**मौजे : तक्का येथील मोराज रिव्हरसाईड पार्क, बिल्डींग नं.पी-१, रुम नं.०३, तळमजला, तक्का, ता.पनवेल, जि.रायगड**

**चार चाकी गाडीचे वर्णन खालीलप्रमाणे**

**२) आर.टी.ओ. पनवेल-रायगड यांच्याकडून मिळालेले स्वीफ्ट डिझायर VXIBSIV (ब्ल्यू कलर) चा परमिट क्रमांक MH-46AU6509 आहे.**

वरील मिळकती या कै.भानुदास सिताराम शिंदे यांच्या स्वकष्टार्जित मिळकती असून श्री.प्रमोद भानुदास शिंदे व सामनेवाला हे कै.भानुदास सिताराम शिंदे यांचे कायदेशीर वारस आहेत. ह्या हक्काबद्दल कोणाही व्यक्तीस हरकती घ्यावयाच्या असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याच्या आत ह्या मे.कोर्टात प्रत्यक्ष हजर राहून हरकती घ्यावयाच्या आहेत, जर या कालावधीमध्ये योग्य त्या हरकती घेतल्या नाहीत तर हे मे.कोर्ट श्री.प्रमोद भानुदास शिंदे व सामनेवाला यांच्या हक्काबद्दल पुरावा घेण्याची ताबडतोब कार्यवाही करेल आणि ते जर कै.भानुदास सिताराम शिंदे यांच्या वारस पत्रास हक्कवार आहेत असे सिद्ध झाल्यास त्यांना हे वारसपत्र मंजूर करेल.

आज दि.९/०७/२०२१ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिली.

**सही/-** क.लिपीक, दि.न्या.व.स्तर, पनवेल — **कोर्टाचा शिक्का** — **सही/-** सहा.अधिक्षक, दि.न्या.व.स्तर, पनवेल



मा.राव साहेब
अर्जदारातर्फे वकील
अॅड.सुनित पाटील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.७६९/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२५/०८/२१

१) अनंत गणू बहिरा
पत्ता : १६४६, एकविरा मंदिरा जवळ,
तक्का गाव, ता.पनवेल, जि.रायगड
२) ज्ञानेश्वर गणू बहिरा
पत्ता : एकविरा मंदिराजवळ,
तक्का गाव, ता.पनवेल, जि.रायगड
३) नरेश गणू बहिरा
४) रवींद्र गणू बहिरा
क्र.३ व ४ यांचा पत्ता : १६४६, एकविरा मंदिरा जवळ,
तक्का गाव, ता.पनवेल, जि.रायगड
५) हरेश गणू बहिरा
पत्ता : १६४६, गणपती मंदिरा जवळ,
तक्का गाव, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, कै.लिलाबाई उर्फ निलाबाई गणू बहिरा ह्या दि.१०/१२/२००९ रोजी मौजे : तक्का गाव, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे मयत झालेले आहेत.

तसेच कै.लिलाबाई उर्फ निलाबाई गणू बहिरा यांचे पती कै.गणू रामजी बहिरा हे दि.२४/१२/१९८७ रोजी मौजे : तक्का गाव, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेल्या आहेत.

कै.लिलाबाई उर्फ निलाबाई गणू बहिरा यांचे मालकीची मौजे : काळुंद्रे, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णन करण्यात आलेल्या मिळकती आहेत.

**संपादीत मिळकतीचे वर्णन**
**युनिट केस नं.३१ (३८) बी**

| मौजे | सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार |
|---|---|---|---|
| काळुंद्रे | ९९ अ | ०-२८-०० | ०.२८ |

वर वर्णन केलेले संपादीत मिळकत व त्या मोबदल्यात मिळणाऱ्या भूखंडाबाबत कै.लिलाबाई उर्फ निलाबाई गणू बहिरा यांचे कायदेशीर वारस असल्याचा वारस दाखला मिळविण्यासाठी अर्जदार यांनी नामदार कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर वारस दाखल्याच्या कामी कोणाच्या ही कसल्याही हरकती असल्यास सदरच्या हरकती ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याचे आत मे.कोर्टात दाखल कराव्यात. मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांचे लाभांत वारस दाखला दिला जाईल याची नोंद घ्यावी.

आज तारीख ०९/०७/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाने शिक्क्याने नोटीस दिली.

**सही/-** क.लिपीक, दि.न्या.व.स्तर, पनवेल — **कोर्टाचा शिक्का** — **सही/-** सहा.अधिक्षक, दि.न्या.व.स्तर, पनवेल



मा.गोडसे मॅडम
अर्जदारातर्फे वकील
अॅड.सुनित पाटील

### जाहीर नोटीस

पनवेल येथील मे.दिवाणी न्यायाधिश वरिष्ठ स्तर यांचे कोर्टात
दि.चौ.अर्ज नं.७६८/२०२१
नि.नं.८/ड
ने.ता.२५/०८/२१

१) परशुराम महादेव बहिरा, वय : ५२ वर्षे
पत्ता : १६४०, गणपती मंदिराजवळ,
तक्का गाव, ता.पनवेल, जि.रायगड
२) अंजली भरत चौघुले, वय : ६१ वर्षे
३) इंदिरा पांडुरंग पाटील, वय : ४७ वर्षे
क्र.२ आणि ३ यांचा पत्ता : मु.कंडे गाव, पो.नवघर,
ता.उरण, जि.रायगड
४) केसरीनाथ महादेव बहिरा, वय : ५० वर्षे
पत्ता : १६४०, गणपती मंदिराजवळ,
तक्का गाव, ता.पनवेल, जि.रायगड
५) तुळशीराम महादेव बहिरा, वय : ४८ वर्षे
पत्ता : १६४०, गणपती मंदिरा जवळ,
तक्का गाव, ता.पनवेल, जि.रायगड
६) मरिबाई दत्ता कोळी, वय : ५६ वर्षे
पत्ता : १६४७, गणपती मंदिरा जवळ,
तक्का गाव, ता.पनवेल, जि.रायगड — अर्जदार

विरुद्ध

कोणीही नाही — सामनेवाला

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, कै.यमुना महादेव बहिरा ह्या दि.३१/१२/२०१८ रोजी मौजे : तक्का गाव, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड येथे मयत झालेले आहेत.

तसेच कै.यमुना महादेव बहिरा यांचे पती कै.महादेव रामजी बहिरा हे दि.१५/०७/२०१६ रोजी मौजे : तक्का गाव, ता.पनवेल, जि.रायगड येथे मयत झालेल्या आहेत.

कै.यमुना महादेव बहिरा यांचे मालकीची मौजे : काळुंद्रे, ता.पनवेल, जि.रायगड येथील खालील वर्णन करण्यात आलेल्या मिळकती आहेत.

**संपादीत मिळकतीचे वर्णन**
**युनिट केस नं.३१ (३८) बी**

| मौजे | सर्व्हे नं./हिस्सा नं. | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार |
|---|---|---|---|
| काळुंद्रे | ९९ अ | ०-२८-०० | ०.२८ |

वर वर्णन केलेले संपादीत मिळकत व त्या मोबदल्यात मिळणाऱ्या भूखंडाबाबत कै.यमुना महादेव बहिरा यांचे कायदेशीर वारस असल्याचा वारस दाखला मिळविण्यासाठी अर्जदार यांनी नामदार कोर्टात अर्ज दाखल केलेला आहे. तरी सदर वारस दाखल्याच्या कामी कोणाच्या ही कसल्याही हरकती असल्यास सदरच्या हरकती ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून एका महिन्याचे आत मे.कोर्टात दाखल कराव्यात. मुदतीनंतर आलेल्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अर्जदार यांचे लाभांत वारस दाखला दिला जाईल याची नोंद घ्यावी.

आज तारीख ०९/०७/२०२१ रोजी माझ्या सहीने व कोर्टाने शिक्क्याने नोटीस दिली.

**सही/-** क.लिपीक, दि.न्या.व.स्तर, पनवेल — **कोर्टाचा शिक्का** — **सही/-** सहा.अधिक्षक, दि.न्या.व.स्तर, पनवेल

# मोबाईल शोरूममध्ये घरफोडीत हजारोंचा ऐवज लंपास

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल शहरातील दोन वेगवेगळ्या मोबाईल शोरूममध्ये अज्ञात चोरट्यांनी केलेल्या घरफोडीत अनेक नामांकीत कंपनीचे मोबाईल फोन, चार्जर, पॉवरबँक असा मिळून जवळपास ५८ हजारांचा ऐवज चोरल्याची घटना घडली आहे.

शहरातील बेस्ट डिल मोबाईल शॉपी तसेच ए.के. मोबाईल शॉपी या मोबाईल दुकानांचे शटर कोणीतरी अज्ञात चोरट्यांनी तोडून त्यावाटे आत दुकानात प्रवेश करून वेगवेगळ्या नामांकीत कंपनीचे मोबाईल फोन, चार्जर, पॉवरबँक असा मिळून जवळपास ५८ हजारांचा ऐवज चोरल्याची तक्रार पनवेल शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे.

# पनवेल परिसरातून दोन अल्पवयीन मुलींना नेले फूस लावून पळवून

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल परिसरातून दोन अल्पवयिन मुलींना फूस लावून पळवून नेल्याची घटना घडल्याने पालक वर्गात भीतीयुक्त वातावरण आहे.

करंजाडे से.-४ येथे राहणारी १५ वर्षे १० महिन्यांची मुलगी हि राहत्या बिल्डींगच्या खाली दूध आणण्यास खाली आली असता कोणीतरी अज्ञात इसमाने अज्ञात कारणाकरीता त्या मुलीस फूस लावून पळवून नेल्याची तक्रार पनवेल शहर पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. ती रंगाने सावळी, चेहरा उभट, डोक्याचे केस काळे व मध्यम, गळ्यात काळ्या रंगाचा धागा, अंगाने मध्यम, उंची ५ फूट असून उजव्या हातात लोखंडी कडे, डाव्या हाताच्या मनगटावर इंग्रजी भाषेत नाव गोंदलेले आहे. हिच्या अंगात गुलाबी रंगाचा टिशर्ट व खाकी रंगाची लेगिन्स, पॅरेगॉन कंपनीची प्लॅस्टिक चप्पल, डाव्या पायात काळ्या रंगाचा धागा आहे. तर दुसऱ्या घटनेत तालुक्यातील कोपरोली येथील के.के. बिल्डींग साईट परिसरात राहणारी १५ वर्षे ८ महिन्यांची मुलीला फूस लावून पळवून नेल्याची तक्रार पनवेल तालुका पोलिस ठाण्यात करण्यात आली आहे. उंची ४.५ फूट, रंग गोरा, चेहरा गोल, डोक्याचे केस काळे व बारीक, डोळे काळे, नाक सरळ, बांधा पातळ असून नाकात सोन्याची चमकी, डाव्या पायात काळ्या रंगाचा धागा आहे. अंगात काळ्या रंगाचा टिटॉप व काळ्या रंगाची लेगिन्स आहे. पायात सँडल असून तिला मराठी व हिंदी भाषा अवगत आहे.

# नालंद गांगुर्डे यांची तहसीलदारपदी नियुक्ती

**दै.रायगड नगरी । पनवेल**

पनवेल तहसीलदार कार्यालयातील निवडणूक शाखेतील नायब तहसीलदार नालंद गांगुर्डे यांची तहसीलदार पदी बढती झाली आहे. त्यांनी नुकताच पदभार स्वीकारला आहे.

नालंद गांगुर्डे यांची तहसीलदार पदी बढती झाल्याने त्यांचे अभिनंदन केले जात आहे. त्यांनी कोकण भवन, बेलापूर येथे तहसीलदार पदी नियुक्ती करण्यात आली.

# माथेरानमध्ये अद्ययावत वाहनस्थळासाठी नगरपरिषदेकडून प्रयत्न!

**दै.रायगड नगरी । माथेरान**

माथेरानचे पर्यटन सुरू झाल्याने वर्षा सहलींसाठी माथेरान कडे पर्यटकांचा ओघ सुरू झाला आहे पण वाहनस्थळासाठी जागा अपुरी ठरत असल्याने अनेकांना घाटातूनच परतावे लागत असल्याने माथेरानमध्ये पालिकेकडे असलेला भूखंड खाली करून वाहनस्थळासाठी वापर करण्यास पालिका प्रशासनाला कठोर पावले उचलण्याची गरज निर्माण झाली आहे.

माथेरानमध्ये सध्या वर्षा पर्यटनाची लगबग दिसून येत असून पावसाची मजा घेण्यासाठी तरुणाई रस्त्यावर उतरल्याने माथेरान पर्यटकांनी गजबजले आहे, कोरोनामुळे लोकल ट्रेन बंद असल्याने येथे येणारा पर्यटक स्वतःच्या वाहनाने माथेरानला येत आहे. येथे येण्यासाठी नेरळ माथेरान हा एकमेव घाट मार्ग उपलब्ध आहे व ह्या मार्गावर अनेक ठिकाणी निमुळती वळणे व पावसात सुरू होणार धबधबे आहेत जेथे रस्त्याच्या दोन्ही बाजूस वाहने उभी केली जातात त्यातून मार्ग काढत वाहन येथील प्रवेशद्वार जवळ पोहचले तर त्यांना फक्त वाहनास जागा शोधण्यासाठी दीड ते दोन तास वाया घालवावे लागत आहे विकेंड ला ही स्थिती नेहमीच पहावयास मिळत असल्याने वाहनस्थळाचा प्रश्न सध्या येथे चर्चेचा ठरू लागला आहे.

विकेंड ला जाणवणारी ही समस्या सोडविण्याचा विडा माथेरानच्या नगराध्यक्षा सौ प्रेरणा सावंत यांनी घेतला असून वाहनस्थळा च्या बाजूला असलेला नगरपालिकेचा भूखंड क्र ९३ ह्या जागेचा वापर वाहनस्थळासाठी करण्यासाठी त्यांनी प्रयत्न सुरू केले आहेत ४ डिसेंबर २०१४ साली हा भूखंड वाहनस्थळासाठी वापरण्यात यावा असा ठराव नगरपालिकेच्या विशेष सभेमध्ये मंजूर झाला होता त्यानंतर हा भूखंड वाहनस्थळासाठी हस्तांतरित करण्याची प्रक्रिया सुरू झाली होती पण अजून ही राज्य शासन त्याकडे गंभीर्याने पाहत नसल्याने हा प्रश्न इतकी वर्षे धूळखात पडून आहे ह्या दरम्यान सदर प्लॉट वर मालवाहू घोड्यांचे अतिक्रमण झाले असून संपूर्ण प्लॉट ह्या घोडेवाल्यांच्या गिळंकृत केला आहे व दिवसेंदिवस येथे घोड्यांची संख्या वाढत चालली असताना त्याकडे सर्वत्र मालवाहू घोडेच दिसत आहेत हा प्लॉट वाहनस्थळासाठी वापरला गेल्यास इथला वाहनस्थळाचा प्रश्न काही अंशी सुटणार आहे पण त्यासाठी प्रथम हा भूखंड मोकळा करून घेणे गरजेचे आहे व त्यासाठी नगराध्यक्षांनी पावले उचलण्यास सुरवात केली असून येथील अतिक्रमणे त्वरित काढण्याच्या हालचाली सुरू झाल्या आहेत पण तो पर्यंत बेशिस्त वाहनचालकांना चाप बसावा म्हणून माथेरान पोलीस ठाण्याबरोबर पत्र व्यवहार करून येथे गर्दीच्या वेळी जादाची पोलीस कुमक उपलब्द करावी अशी मागणी केली आहे पण खरा प्रश्न घाटातील वाहनकोंडीचा असल्याने हा भाग नेरळ पोलिसांच्या हद्दीत येत असल्याने त्यांनाही घाटातील वाहतुकीकडे लक्ष ठेवण्याचे पत्र दिले आहे मागील वर्षी एमएमआरडीए च्या माध्यमातून भरीव निधी वापरून येथे पार्किंग चे सुशोभकरण करण्यात आले होते त्याने येथील वाहन उभी करण्याची क्षमता देखील वाढली होती पण संपूर्ण माथेरान ला येणाऱ्या पर्यटकांची संख्या लक्षात घेता ही जागा अपुरी आहे आता सध्या येथे तीनशे च्या आसपास वाहने उभी राहू शकतात पण येणाऱ्या गाड्यांची संख्या लक्षात घेता अजून ५०० गाडी उभी राहील अशी जागा उपलब्द होणे गरजेचे आहे.माथेरानच्या पर्यटन वाढीसाठी येथे सातशे ते आठशे गाडी राहू शकेल असे सूसज्ञ वाहनस्थळ असणे गरजेचे असून हे वाहनस्थळ व्हावे ह्यासाठी माथेरांमधील सर्वच राजकीय पक्ष आग्रही असल्याने नागराध्यक्षांनी घेतलेल्या ह्या भूमिकेला येथील सर्वच थरातून पाठिंबा मिळत आहे.



माथेरान नगरपरिषद मागील १४ वर्षांपासून एम पी ९३ ह्या भुखंडाची वाहनतळ म्हणून विकसीत करण्यासाठी मागणी करीत असताना आता अवैध रित्या मोठया प्रमाणात मालवाहू तसेच इतर घोडे बांधून वनसंपदा नाश करून अतिक्रमण करून हा प्लॉट जवळजवळ गिळंकृत केला आहे व घोड्याच्या लिदीचे डोंगर उभारून माथेरानची नैसर्गिक संपदा नष्ट करण्याचा प्रयत्न चालू आहे. शासनाने ताबडतोब हा प्लॉट नगरपरिषदेच्या ताब्यात देऊन वाहनतळ विकसित करण्यासाठी आदेश दयावेत.

**शिवाजी शिंदे --विरोधी पक्षनेते माथेरान नगरपरिषद**

माथेरान वाहनस्थळासाठी नगरपालिके कडून भूखंड उपलब्ध होणार आहे पण त्यापूर्वी वनविभाग व माथेरान पोलिसांनी ह्या ठीकानी असलेले अतिक्रमण काढून टाकावे येथे मालवाहतुकीसाठी लागणारे घोडे बांधले जात असल्याने सर्व परिसरात बकाल पणा आला असून सर्वत्र लिदीचे डोंगर उभे राहिल्याने दुर्गंधीचे साम्राज्य पसरले आहे पहिल्यांदा हे काढून येथे वाहनस्थळ करणार आहोत.

**सौ प्रेरणा सावंत नगराध्यक्षा माथेरान**

# उरणमध्ये गणेश मूर्ती दाखल ; गणेशोत्सवावर कोरोनाचे संकट

**दै.रायगड नगरी । उरण**

शुक्रवार १०/ ९/२०२१ रोजी सार्वजनिक गणेशोत्सवाला प्रारंभ होणार असून रविवार दिनांक १९/९/२०२१ रोजी अनंत चतुर्थीच्या दिवशी दहा दिवसाच्या सार्वजनिक गणेशोत्सवाचे विसर्जन करण्यात येणार आहे. आता काही महिन्यांवर गणेशोत्सव आल्याने उरण मधील बाजारपेठेत सुंदर व आकर्षक प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्ती दाखल झाले आहेत.

बाजारपेठेत प्लास्टर ऑफ पॅरिस (पीओपी)च्या गणेश मूर्तींना मोठी मागणी असल्याने प्लास्टर ऑफ पॅरिसच्या गणेशमूर्ती खूप मोठ्या प्रमाणात उरण मध्ये दाखल झाले आहेत.अनेक गणेशभक्तांनी आपल्या गणेशमूर्तींची बुकिंग सुद्धा करून ठेवली आहे. पाचशे रुपयांपासून ते तीन हजार,पाच हजार रुपये पर्यंत गणेश मूर्ती बाजारात उपलब्ध आहेत.पण यंदा मात्र गेल्या वर्षीप्रमाणे याही वर्षी गणेशोत्सवावर कोरोनाचे संकट, सावट असल्याने गणेश मूर्तिकार, कारखानदार तसेच गणेशभक्तांमध्ये नाराजीचा सूर उमटत आहे.

महाराष्ट्र शासनाने कोरोना रोगाचा वाढता प्रभाव लक्षात घेता गेल्या वर्षीप्रमाणे याही वर्षी गणेशोत्सवावर निर्बंध आणले आहेत. यामध्ये गणेशोत्सव अत्यंत साधेपणाने साजरी करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. याशिवाय सार्वजनिक गणेश मूर्तीची उंची चार फूट तर घरगुती गणेशमूर्तीची उंचीवर दोन फुटाची मर्यादा घालण्यात आलेली आहे. शिवाय मिरवणूक काढता येत नाही तसेच गर्दी होईल व कोरोना वाढेल असे कोणते कार्यक्रम साजरे करण्यास बंदी घातल्याने कोणतेही सांस्कृतिक,धार्मिक कार्यक्रम गणेशोत्सव मंडळांना तसेच गणेश भक्तांना आयोजित करता येणार नाही. गेल्या वर्षी गणेशोत्सवाचा आनंदाला कोरोनामुळे मुकावे लागले. यावर्षीही गणेशोत्सव मोठ्या उत्साहात साजरा करता येणार नसल्याने गणेशभक्तांमध्ये नाराजी पसरली आहे.



# माणगांवमध्ये दुकानदारांची ऑनलाईन पेंमेट करतो सांगून फसवणूक करण्याचा प्रयत्न

**दै.रायगड नगरी । माणगाव**

माणगांव शहरातील दोन दुकानदारांची चार जणांकडून ऑनलाईन पेमेंट करतो असे सांगुन फसवणूक करण्याचा प्रयत्न करण्यात आला असून त्यांच्यावर माणगांव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हकीकत अशी की,८ जुलै रोजी दुपारी ३.३० वाजता फिर्यादी व दुकानदार रवींद्र सिंग व निलेश सखलचंद चव्हाण यांच्या दुकानात जाऊन ९८०० रुपयांचे सम्राट कंपनीचे १५ लिटर तेलाचे ४ लोखंडी पत्र्याचे डबे, ८४०० रुपये गोडेतेलाचा एक लिटर तेलाचा बॉक्स असा एकूण १८२०० रुपये किमतीचा माल विकत घेतला. हे सामान खरेदी करून त्याचा मोबदला रोख स्वरूपात न देता तुमच्या बँक अकाउंटला पैसे पाठवतो असे बोलून फिर्यादी यांच्या बँक अकाउंटवर पैसे न पाठवता फिर्यादी यांना गुगल पे व भारत पे मोबाईल वर पाठवला. तो खोटा मेसेज असल्यामुळे आरोपी १ते ४ यांनी संगणमत करून फसवणूक केली.

त्यामुळे विकी रामदास चौधरी वय १८, रा. केशव नगर मुंडवा पुणे, सागर संदीप हरगुडे वय २३, अमर बाळासाहेब हरगुडे वय २६, वैभव वैजनाथ वाघमोडे वय १८ हे तिघे राहणार वागोली केशनंद पुणे या आरोपीवर कॉ. गुन्हा रजिस्टर नं.१६६/२०२१ भा. दंड वि. संहिता कलम ४२०,५११,३४ सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० चे ६६ सी नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस निरीक्षक श्री. खेडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार दोडकुलकर करीत आहेत.

# स्वस्तात सोने देण्याच्या बहाण्याने फसवणूक करणारी महिला अखेर जेरबंद

**दै.रायगड नगरी । पनवेल**

स्वस्तात सोने देण्याच्या बहाण्याने सातारा येथील एका ज्वेलर्स मालकाकडून तब्बल १ कोटी ४३ लाख रुपये उकळणाऱ्या माधवी सुहास चव्हाण उर्फ माधवी ढेंबे (३१) या महिलेला नवी मुंबई पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेने बुधवारी अटक केली आहे.

माधवी ढेंबे या महिलेने महाराष्ट्रातच नव्हे तर जम्मू काश्मिरसह इतर राज्यातील अनेक व्यक्तींना तसेच चांगल्या पदावर कार्यरत असलेल्या व्यक्तींना कोटय़वधी रुपयांचा गंडा घातला आहे. विशेष म्हणजे माधवी चव्हाण हिच्यावर विविध ठिकाणी फसवणुकिचे १२ गुन्हे दाखल असून या सर्व गुह्यात तीने जामिन मिळविला आहे. जामिन मिळवून बाहेर आल्यानंतर पुन्हा एखादा सावज गाठून त्याची फसवणुक करायची अशी या महिलेची गुन्हे करण्याची पद्धत आहे. प्रकरणात फसवणुक झालेल्या ज्वेलर्स मालकाचे सातारा येथील नागठाणे येथे जवेलर्सचे दुकान असून माधवी सुहास चव्हाण ही महिला कस्टममध्ये अधिकारी असल्याचे तसेच ती कस्टम मधुन सोने आणुन ते मुंबईतील प्रतिष्ठित ज्वेलर्सच्या माध्यमातून बिलासहित स्वस्तात देत असल्याची माहिती या ज्वेलर्स मालकाला मिळाली होती. २०१९ मध्ये अमोल बडेकर व विशाल गायकवाड या दोघांनी ज्वेलर्स मालकाची माधवी चव्हाणसोबत कळंबोली येथे भेट घडवून दिली होती. त्यानंतर माधवी चव्हाण उर्फ माधवी ढेंबे हिने १२.४ किलो वजनाची सोन्याची विट ज्वेलर्स मालकाला दाखवून त्यातील काही सोने स्वस्तात देण्याचा बहाणा करुन ज्वेलर्स मालकाकडून तब्बल १ कोटी ४३ लाख रुपये उकळले. मात्र त्यानंतर माधवी ढेंबे हिने त्यांना सोने देण्यास टाळाटाळ केली होती. त्यावेळी माधवी ढेंबे व दादर येथील रमेश ज्वेलर्सचा मालक रमेश जैन या दोघांनी दिवाळी नंतर सोने देण्याचे आश्वासन ज्वेलर्स मालकाला दिले होते. मात्र त्यांनी सोने न दिल्याने सातारा येथील ज्वेलर्स मालकाने माधवी ढेंबे हिची माहिती काढली असता, ती कस्मटमध्ये अधिकारी नसल्याचे तसेच तिने अनेकांना कोटय़ावधीचा गंडा घातल्याचे त्यांना समजले. त्यानंतर त्यांनी नवी मुंबई पोलिसांच्या आर्थिक ग्रृहे शाखेकडे धाव घेऊन तक्रार दाखल केली.

त्यानुसार आर्थिक गुन्हे शाखेने माधवी ढेंबे व रमेश जैन या दोघां विरोधात गत मे महिन्यात कळंबोली पोलीस ठाण्यात फसवणुकिसह अपहाराचा गुन्हा दाखल केला होता. त्यानंतर आर्थिक गुन्हे शाखेने दिड महिन्यानंतर माधवी चव्हाण हिला अटक केली आहे. न्यायालयाने तिची पाच दिवसाच्या पोलीस कोठडीत रवानगी केली आहे. माधवीने नवी मुंबईत देखील अनेकांना कोटय़ावधींचा चुना लावला आहे. यात वाशीत डान्स क्लास चालविणाऱ्या सोनल साखरे हिला देखील तीने कस्टममधून मिळणारी सोन्याची नाणी कमी किंमतीत विकत देण्याचे अमिष दाखवून तीच्याकडून तब्बल ९५ लाख रुपये उकळले आहेत. त्यामुळे नवी मुंबई गुन्हे शाखेने तीला २०१६ मध्ये अटक केली होती. त्यानंतर तीने कोपरखैरणे येथे राहणाऱ्या वासुदेव शिरसाठ या टॅक्सी चालकाला चार लाख तसेच वाशीत राहणारे चंद्रकांत पाळसे यांच्याकडून २० लाख रुपये, मुंबईतील मोहम्मद अस्लम सोफा यांच्याकडून १ लाख ८९ हजार रुपये उकळले आहेत. तसेच तीने नांदेड येथील सोन्या-चांदीच्या दागिन्यांचा व्यवसाय करणाऱ्या उल्हास रेखापार यांना कमी किंमतीत दोन किलो सोने देण्याचे अमिष दाखवुन त्यांच्याकडून तब्बल ३४ लाख रुपये उकळले आहेत.

माधवीने जम्मु काश्मिरमध्ये देखील अशाच पद्धतीने फसवणुक केली असून जम्मु-काश्मिर पोलिसांनी तीच्या विरोधात अटक वारंट काढून तीला अटक केली होती. माधवीने ब्लॅक मनी बाळगणाऱ्या मुंबई व नवी मुंबईतील अनेक व्यक्तींना त्यांचा काळा पैसा सोन्यात गुंतविण्याचा सल्ला देऊन त्यांना कस्टमकडून पकण्यात आलेले सोने कमी किंमतीत देण्याचे अमिष दाखविल्याचे देखील तपासात आढळून आले आहे. तीच्या या अमिषाला बळी पडून अनेक प्रतिष्ठीत व्यक्तींनी व काही नगरसेवकांनी तीच्याकडून कमी किंमतीत सोने विकत घेण्यासाठी तीला कोटय़वधी रुपये दिल्याचे देखील निष्पन्न झाले आहे. बदनामीच्या भीतीने व माधवीला देण्यात आलेल्या रक्कमेचा तपशील उघड होईल या भितीने अनेकांनी माधवी विरोधात पोलीस ठाण्यात तक्रार करण्याऐवजी गप्प राहणे पसंत केल्याचे बोलले जात आहे.


# ग्रुप ग्रामपंचायत वावंजे

ता.पनवेल, जि.रायगड

## जाहीर निविदा

दि.०९/०७/२०२१

प्रति,
अधिकृत / अनुभवी ठेकेदार,

यांस कळविण्यात येते की, ग्रुप ग्रामपंचायत वावंजे हद्दीतील खालील विकासकामे व खरेदी करावयाची आहेत. त्याकरिता ग्रामंपचायत हद्दीतील अधिकृत/अनुभवी ठेकेदारांकडून सिलबंद निविदा मागविण्यात येत आहे. सदर कामांच्या कोऱ्या निविदा मिळण्याकरिता अर्जाची तारीख दि. १०/०७/२०२१ ते १५/०७/२०२१ पर्यंत या दिवशी कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात मिळतील.

सदर निविदा दि. १६/०७/२०२१ रोजी दुपारी २ वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील. सदर निविदा त्याच दिवशी कार्यालयीन वेळेत ३ वाजेपर्यंत उघडण्यात येतील. कामांकरिता लागणारी इसारा रक्कम ग्रुप ग्रामपंचायत वावंजे यांच्या नावाने डिमांड ड्राफ्टच्या द्वारे / रोखीने स्वीकारण्यात येतील. कोणतीही एक निविदा मंजूर करणे अगर नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे. इसारा रक्कम अंतिम देयकातून कापून घेतली जाईल.

| अ. क्र. | कामाचे नाव | योजनेचे नाव | अंदाजपत्रक रक्कम | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|
| १ | प्राथमिक शाळा वावंजे शौचालय आणि मुतारी बांधणे | १५ वा वित्त आयोग | २००००० | ६ महिने |
| २ | उर्दू शाळा वावंजे शौचालय आणि मुतारी बांधणे | १५ वा वित्त आयोग | २००००० | ६ महिने |
| ३ | वावंजे अंतर्गत ५ अंगणवाड्या अंतर्गत शौचालय दुरुस्ती व रंगरंगोटी करणे | जिल्हा वार्षिक योजना जनसुविधा योजना सन २०20/२१ | १००००० | ६ महिने |
| ४ | वावंजे आदिवासी भेंडीची वाडी येथे सार्वजनिक शौचालय बांधणे | | २००००० | ६ महिने |
| ५ | वावंजे बौद्धवाडी येथे बोअरवेल दुरुस्ती करणे | | ५०००० | ६ महिने |
| ६ | वावंजे आदिवासी भेंडीची वाडी बोअरवेल दुरुस्ती करणे | | ५०००० | ६ महिने |
| ७ | वावंजे आदिवासीवाडी मानपाडा लघु नळ पाणी पुरवठा दुरुस्ती करणे | | १०४२९० | ६ महिने |
| ८ | ग्रामपंचायत कार्यालय येथे सार्वजनिक शौचालय व मुतारी बांधणे | | २००००० | ६ महिने |
| ९ | निताळे मानपाडा येथील बायांच्या झाडांपासून ब्रिजपर्यंत आदिवासीवाडी पर्यंत रस्ता करणे | | ३१०००० | ६ महिने |
| १० | खानावचा बंगला येथे नाले साफसफाई करणे | | ५०००० | ६ महिने |
| ११ | भेंडीची वाडी येथे बोअरवेल मारणे | | ४४२९० | ६ महिने |
| १२ | सुभाष धोंगडे यांचे घरापासून ते संजय जोगळे यांचे घरापर्यंत रस्ता व गटार बांधणे | | ४५०००० | ६ महिने |
| १३ | ग्रामपंचायत कार्यालयाजवळ पाण्याची साठवण टाकी दुरुस्ती व रंगरंगोटी करणे | | १७०३९१ | ६ महिने |

| अ. क्र. | कामाचे नाव | योजनेचे नाव | अंदाजपत्रक रक्कम |
|---|---|---|---|
| १ | क्लोरीवॅट खरेदी करणे | जिल्हा वार्षिक योजना जनसुविधा योजना सन २०20/२१ | ६५७६४ |
| २ | वावंजे अंगणवाडी येथे हॅण्डवॉश सेंटर उभारणे (वावंजे अंतर्गत ५ अंगणवाड्या) | | ८६३०६ |
| ३ | घंटागाडी खरेदी करणे | | ६०६६९७ |
| ४ | वैयक्तीक कुटुबांना ओला व सुका कचरा वर्गीकरण करणेकामी डस्टबीन खरेदी करणे | | २००००० |
| ५ | प्राथमिक शाळा १ ते ५ लाईटबिल भरणा करणे | | १००००० |
| ६ | १ ते ५ शाळांचे दप्तर स्कॅनिंग करणे | | १६५७६४ |
| ७ | अंगणवाडी १ ते ५ गॅस सिलेंडर, लाईट फिटींग, लाईट बिल भरणा करणे | | १००००० |
| ८ | अंगणवाडी १ ते ५ पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करणे | | ८६३०६ |

**अटी व शर्ती :-**

१) सर्वांत कमी दराचे अथवा कोणतेही टेंडर मंजूर अगर नामंजूर करण्याचा अधिकार ग्रामपंचायतीने राखून ठेवला आहे त्याची कारणे दिली जाणार नाहीत.

२) सदर काम पंचायत समितीकडील बांधकाम विभाग तांत्रिक अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली करणेचे आहे त्याचे मूल्यांकनाप्रमाणे बील अदा करण्यात येईल.

३) काम ज्यांच्या नावे मंजूर होईल त्यांनी नियमा प्रमाणे रूपये १०० स्टॅम्प पेपरवर बॉण्ड करून देणे.

४) कामाचे एस्टीमेंट ऑफिस वेळेत पहावयास मिळेल.

५) दिलेल्या मुदतीत काम पूर्ण न झाल्यास बिल अदा करणे अगर न करणे याचा अधिकार ग्रामपंचायतीस राहील.

६) साहित्याचे व वस्तूचे दर सर्व (व्हॅट टॅक्स इ.) करासहीत पोहोच नमूद करणेचे आहेत. प्राप्त दरापैकी कोणतेही एक दरपत्रक

**सही/-**
**ग्रामसेवक**
**ग्रुप ग्रामपंचायत वावंजे**

**सही/-**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत वावंजे**